नेहरू बाल पुस्तकालय

NEHRU BAL PUSTAKALAYA

# कोणे एके काळी...

(भाग I)



रु. 1.50

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नेहरू बाल पुस्तकालय — 14

# कोणे एके काळी....

(भाग - I)

एम. चोकसी आणि पी. एम. जोशी

चित्रांकन : पुलक विश्वास

अनुवाद : लीलावती भागवत



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली

एप्रील 1972 (वैशाख 1893)

© एम. चोकसी आणि पी. एम. जोशी, 1971

रु. 1.50

ONCE UPON A TIME
*(Marathi)*

वितरक
पॉप्युलर प्रकाशन,
35 सी, ताडदेव रोड, दादर, मुंबई 34 डब्लू. बी. आर.

प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया ए 5, ग्रीन पार्क, नवी दिल्ली 16; मुद्रक : मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई 4, आणि चित्रे व कव्हराची छपाई इंद्रप्रस्थ प्रेस (सी. बी. टी.) नेहरू हाऊस, 4 बहादुरशहा जफर मार्ग, नवी दिल्ली 1

# मोहेंजोदारोच्या प्राचीन नगरीत

शहर मोहेंजोदारो. वेळ ऐन दुपारची. घरांच्या सुबक, नीटनेटक्या रांगावर मे महिन्यातला प्रखर सूर्य तळपतो आहे. घरे विटांची, सपाट छपरांची. त्यांना खिडक्या नाहीत. आणि दारे आहेत ती सगळी आतल्या बाजूला. मधोमध जे आंगण आहे तिकडे उघडणारी. इथे बायका भाजी चिरायला बसत, मसाला कुटीत, भात शिजवीत, भांडी घाशीत; आणि दिवसाचे घरकाम आटोपले की त्यांच्या गप्पाही इथेच चालत. एकीकडे सूत कातणेही चालू असे. अवतीभोवती मुले हुंदडत. आंगणाच्या एका कोपऱ्यात ओबडधोबड चौकोन आखलेले होते तिथे मुलं तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळत.

उन्हाचा कडाका आणखीच वाढला. आता आंगणात सावली अशी फारशी उरलीच नाही. शिक्के बनवणारा विरोचन आपल्या दुकानात चटईवर लवंडला होता. त्याचीबा यको पण डुलकी घेत होती. बिचारी—दुपारचा सैपाक—आमटी भात नि भाकऱ्या करून थकली होती. घरातल्या सर्व मंडळींनी जेवायला बसण्यापूर्वी नेहमीप्रमाणे आंघोळी केल्या होत्या. उन्हाळ्यातसुद्धा इथे पाण्याची टंचाई नसे. कारण मोहेंजोदारो शहर एका प्रचंड नदीच्या तीरावर वसलेले होते. नदीचे नाव ?—आपण आता तिला सिंधू म्हणतो.

मोठी माणसे झोपली असली तरी मुलांची गडबड चालू होती. विरोचनाचा धाकटा मुलगा हिराप पाहा...स्वारी बाबांच्या दुकानात शिरली. रांगोळीचे कित्ती दगड तिथे पडलेले होते! रांगोळीचा दगड खडूसारखा पांढरा, मऊ असतो. विरोचन या दगडांचे लहान चपटे तुकडे करी. त्यांना चौकोनी किंवा लांबट चौकोनी आकार देई. त्यावर तो प्राण्यांच्या आकृत्या काढी. खाली अक्षरे काढी. ती अक्षरे पण चित्रासारखी.



व्यापारी वगैरे लोक हे ठसे किंवा शिक्के वापरीत—आपली ओळख पटवणारे खास चिन्ह म्हणून. शहरात कारागीर खूप—कुंभार, विटकरी, कोष्टी, सोनार, तांबट, होड्या बनवणारे, पाथरवट—म्हणजे दगडाला आकार देणारे—पण या शिक्केवाल्या इतका महत्त्वाचा कारागीर कोण नसेल. कारण जवळजवळ प्रत्येक नागरिकापाशी स्वतःचा शिक्का असायचा म्हणा ना!

विरोचनाचे दुकान खूप प्रसिद्ध होते. कितीतरी व्यापारी—ज्यांना जास्ती खर्च करणे परवडत असे—त्याच्याकडे येत, त्याची किंमत देऊन त्याच्याकडून कसबी काम करून घेत. त्यांना सर्वांना प्राण्यांच्या आकृत्या आवडत. तऱ्हेतऱ्हेच्या कोरीव ठशांचा तिथला ढीग म्हणजे एक लहानसे प्राणिसंग्रहालयच होते जणूकाही. त्यात भव्य कपाळाचा हुशार हत्ती होता, लांबच लांब शिंगांचा रुबाबदार बैल होता, पट्टेवाले वाघोबाही तिथे होते. इतकेच नाही, तर फक्त उष्ण कटिबंधातल्या दमट प्रदेशात आढळणारे काही प्राणी पण त्यात दिसायचे. उदाहरणार्थ: दलदलीत राहणारा एकशिंगवाला गेंडा आणि नदीत राहणारी मगर.

हिरापने कचऱ्याच्या ढिगातून एक ठिसूळ दगड उचलला आणि कोरण्याचा चाकू कुठे दिसतो का म्हणून इकडे तिकडे पाहिले. एका भिंतीलगत मातीच्या बरण्या नि भांडी मांडून ठेवलेली होती. त्यांत काय काय भरलेले होते! एका कोपऱ्यात कोरकामाच्या चकचकीत हत्यारांची रासच होती. त्यांतच चाकू होते, काही शस्त्रे होती, वस्त्रे पण होती. सर्व हत्यारे तांब्याची. कारण पाच हजार वर्षांपूर्वीच्या त्या काळात लोकांना लोखंडाचा उपयोग करणे माहीत नव्हते.

हिराप आपले कोरण्याचे काम सुरू करणार तोच त्याची लहानगी बहीण काहीतरी ओरडली. तिचा खेळातला पक्षी न्हाणीघरातल्या गटारात पडून वहात गेला होता.

"रडू नकोस." हिराप म्हणाला. "मी तुला दुसरा मिळवून देईन. कुंभारदादांचा मुलगा झंझार माझा मित्र आहे आणि त्याच्याच घरी मी आत्ता जाणार आहे. चल माझ्याबरोबर. त्याचे बाबा खेळणी कशी बनवतात ते आपण पाहू या."

संदीपनने आपल्या भावाच्या हातात हात घातला आणि दोघे रस्त्यावरून चालत निघाली. रस्ता तसा अरुंदच होता. पण सरळ नि स्वच्छ, नदीवरून येणारा वारा मुख्य रस्ताभर वहात असे, आणि त्याचे झोत काटकोन करून जाणाऱ्या बाजूच्या साऱ्या गल्ल्यांमधूनही शिरत. ही दोन मुले दुसऱ्या एका गल्लीत शिरली—कुंभार आळीत. इथे सगळे कुंभार राहात, माती काम करीत. तेही चांगले खाऊन पिऊन सुखी कारागीर होते. कारण त्या काळात मातीच्या भांड्यांना चिक्कार मागणी असे. खाद्य पदार्थ साठवून ठेवण्याचे मुख्य साधन तेच.

इतक्यात झंझारच आपल्या बाबांच्या दुकानातून बाहेर आला, आणि संदीपन ओरडली, "ते बघ माझं पाखरू त्याच्या तोंडात आहे!" ती बोलत असतानाच एक कर्कश शीळ ऐकू आली. हिराप नि संदीपन पुढे धावली आणि झंझारने आपली खास बनवलेली शिट्टी त्यांना दाखवली. दुसऱ्या मुलांच्या शिट्ट्या असत तशी ही पण चिक्कमातीची बनलेली होती, पण हिला पक्ष्याचा आकार दिलेला होता.

दाराशी कुणाचा तरी आवाज आला. झेबरचा. दूरदूरच्या देशांशी देवाणघेवाण करणाऱ्या एका श्रीमंत व्यापाऱ्याचा झेबर हा मुलगा.

"माझ्या काकांनी सोनाराकडून आणलेल्या मोहनमाळा बघितल्यात का तरी? सोन्याच्या माळा?" तो बढाई मारीत म्हणाला. "काका त्या माळा खूप खूप दूर—दुस-



त्याच एका नदीच्या खोऱ्यात (मिसरदेशात म्हणजे ईजिप्तमध्ये) घेऊन जातात. तिथले लोक वाळवंटात दगडाची स्मारकं बांधतात म्हणे अजस्र स्मारकं! तिथल्या बायकांना असल्या मोहनमाळा आवडतात आणि त्यांची राणी–तिथला राजा फराओ आहे ना त्याची बायको – ती पण मोहनमाळ घालते. खऱ्या सोन्याच्या माळा, बरं का?"

"अं:! "हिराप नि झंझार ठणकावून म्हणाले, "खड्यांच्या नि लाकडी मण्यांच्या माळा पण सोन्याइतक्याच सुरेख दिसतात!"

झंझारच्या आईने त्यांचे चढलेले आवाज ऐकले. ती बाहेर आली. तिच्या अंगात एक सुती झगा होता आणि दंडांवर नि हातांत तांब्याच्या बांगड्या होत्या. केसांच्या



अंबाड्यात तिने एक सुंदर आकडा नि फणी घातलेली होती. कंबरपट्टा एका गोल कोंदणाच्या हुकाने सावरलेला होता आणि तिच्या गळ्यात दगडी कोरीव खड्यांची माळ होती. त्यातले काही खडे गोल होते, काही फुगीर लांबोडे.

"आपले कारागीर कसे हुशार आहेत, नाही?" ती हळू आवाजात म्हणाली. "सोन्याच्या आणि रत्नांच्या महागड्या माळा ते तयार करतात परदेशातल्या श्रीमंतांना विकण्यासाठी. आणि साध्या दगडी नि कोरीव मण्यांच्या माळा करतात त्या पण किती सुरेख! आपल्याला कुणालाही त्या वापरायला मज्जा वाटते!"

"आमचे काका कापड पण विकतात." झेबरची बडबड सुरू झाली. "समुद्रावरून दूर दूर नेतात ते. आणि आमची गलबतं बंदरात जाऊन पोचली की तिथल्या व्यापाऱ्यांची ही गर्दी जमते—दागिने घ्यायला, मऊ सुती कापड घ्यायला. तिथल्या शहरातली बडी माणसं छान छान कपडे घालून हिंडतात ना, ते आमच्याच तलम कापडाचे. आणि माहीत आहे का? नुसते जिवंतपणी नाही, मेल्यावरसुद्धा ते आमचे कपडे घालतात."

"किती रे बाता मारतोस, झेबर!" झंझार म्हणाला.

हिरापने मध्येच म्हटले, "तो सांगतो ते खरं आहे. तिथल्या लोकांची एक विचित्र पद्धत आहे. काकांनी मला सांगितलंय. एखादा मोठा माणूस मेला की त्याचं प्रेत ते राखून ठेवतात म्हणे. मऊ कापडात गुंडाळतात अन् रेतीत किंवा खडकात मोठ्ठं थडगं खोदून त्यात ते प्रेत ठेवतात."

संदीपन मध्येच मोठ्याने म्हणाली, "मला मोहनमाळ बघायची आहे.

"नाही मिळणार बघायला!" झेबर म्हणाला. "फक्त सोनाराच्या दुकानातच असतात त्या. सोनाराच्या माळा फक्त श्रीमंतांसाठी असतात. काका त्या विकतात, पण आता त्यांच्याजवळ एकही माळ नाही."

"हे सोनं सोनं म्हणतात ते कुठून येतं रे!" झंझारने विचरले. "आपल्या शहराजवळ तर कुठेच सोनं नाही."

हे ऐकून त्याची आई म्हणाली, "तो होडी बांधणारा कपर्दी आहे ना, त्याच्या वाडीत जा. आताच त्याची होडी परत आली आहे. तो सांगेल

तुम्हाला कोणत्या वस्तू कुठून येतात आणि त्या कुठे जातात ते."

"पण आधी संदीपनला घरी पोचवली पाहिजे." हिराप म्हणाला.

"तिला राहू दे माझ्याकडे" झंझारची आई म्हणाली. "झंझारच्या बाबांनी नवी खेळणी केली आहेत. ती घेऊन खेळत बसेल ती. मग मीच पोचवीन तिला घरी—त्यात पक्ष्याचा पिंजरा आहे एक. त्यात छोटुकलं पाखरू आहे. तिला नक्की आवडेल आणि एक गाढव पण आहे. दोरी खेचली की मुंडी हालवतं."

"अय्या! मग दाखवाच मला!" संदीपन ओरडली. आणि आनंदाने उड्या मारीत सुटली.

हिरापला बरेच झाले. "तुम्ही तिला गल्लीच्या तोंडाशी सोडलंत तर ती एकटीसुद्धा पळत घरी जाईल."

"तसंच करीन." बाईंनी वचन दिले, "आणि मी लक्ष ठेवीन ती घरी पोचेपर्यंत. नाहीतरी आपले रस्ते इतके सरळ आहेत की या टोकापासून त्या टोकापर्यंत पाहता येतं."

दोघे मुलगे सटकले. कोष्टीवस्तीजवळून जात असताना त्यांनी कोष्ट्याच्या मुलाला हाक मारली. तो एका मोठ्या थोरल्या पडवीत त्याचे बाबा मागावर सुताचे कापड विणीत होते ते पाहात होता. यांची हाक ऐकून तो धावत बाहेर आला. तिघे निघाले.

शहराबाहेर त्यांना जवाची नि गव्हाची शेते लागली. जव म्हणजे बार्ली. ही शेते पिकवणारे गावकरी मातीच्या घरात राहात. इथे विटांचे कारखाने होते. त्यांत लोक उघड्या भट्ट्यांमधून विटा भाजीत होते.



ते तसेच पुढे जात असता शेजारच्या एका रस्त्यावरून एका लठ्ठ मुलाने त्यांना हाक मारली. हा मुलगा म्हणजे बृहद्रथ. गावातल्या पुजाऱ्याचा मुलगा. त्याला यांच्या खेळात नेहमीच भाग घेता येत नसे; कारण त्याला दिवसातून अनेक वेळा स्नान करावे लागे. तासन् तास मंत्र पाठ करावे लागत. शिवाय त्याचे बाबा त्याला पुष्कळदा सणवार आणि पंचांग सांगण्याच्या कामगिरीवर कुणाच्या तरी घरी पाठवीत.

"कुठे चाललात तुम्ही?" त्याने धापा टाकीत विचारले. "मी येतो तुमच्याबरोबर. पण असे भराभरा चालू नका. जेवल्यानंतर धावणं चांगलं नाही."

"म्हणजे? तू आत्ता पुन्हा खादाडी केलीस की काय?" दुसऱ्या मुलांनी त्याला चिडवले.

"अर्थात! खातच होतो मी" बृहद्रथ म्हणाला. जेवणापूर्वी मला आंघोळ करावी लागते. मंत्र म्हणावे लागतात त्यामुळे तुमच्यापेक्षा मला जेवायला उशीर होतो."

"मी सांगतो, तू डोंगराएवढं खाल्लं असशील!" झंझार म्हणाला.

"मी जवाच्या बारा भाकऱ्या खाल्ल्या खजुराच्या लोणच्याबरोबर." बृहद्रथ जिभल्या चाटीत म्हणाला. मग हिरापकडे वळून तो म्हणाला, "मी खाल्लेल्या खजुरा-पैकी सर्वांत उत्तम खजूर कोणता होता, माहीत आहे? तुझे काका जुळ्या नदीच्या (युफ्रेटिस-तैग्रीस नद्या) देशातनं जो आणतात ना, तो!" जरा थांबून त्याने काळजीच्या सुरात विचारले, "तुझे काका आता परत यायला निघाले असतील, नाही?"

"हो हिरापने हसून उत्तर दिले, "आणि त्यांनी खजूर आणला की त्यातला थोडा मी तुला न विसरता पाठवीन, बरं? पावसाळ्याच्या आत सगळी जहाजे परत यायला हवीत. म्हणजे आता येणारच माझे काका!"



तिघे जण नदीकाठच्या वाडीकडे निघाले. त्या वाडीच्या पटांगणात गलबते बांधण्याचे काम चालू होते. या शहराचा व्यापार अफाट होता. समुद्रावरून नि जमिनीवरून. गलबते मोठी असत. ती पाण्यावरून चालली की त्यांचा पुढचा भाग लाटांच्या वर उंच डोकावताना दिसे. काहींना शिडे असत. खलाशांना दिवसा सूर्यावरून आणि रात्री 'ध्रुवताऱ्यावरून दिशा कळे. जहाजे शक्य तेवढी काठाजवळून जात. कारण कधी रात्रंदिवस आकाश एकसारखे ढगाळलेले असले म्हणजे वाट चुकण्याची भीती असे.

जहाजवाडीत या मुलांना त्यांचा मित्र भेटला. त्याचे नाव कपद. मोठा प्रेमळ दर्यावर्दी माणूस. त्याने खूप प्रवास केला होता आणि ज्ञानाचे खूप मोठे भांडार होते त्याच्याजवळ. सुंदर सुंदर वस्तू जिथून येत अशा लांबलांबच्या देशांची तो त्यांना माहिती सांगे. तो म्हणे, "सोनं आग्नेयेकडून येतं, दक्षिणपूर्वेकडून. (म्हणजे आजचा म्हैसूर प्रांत, बरं का?) दक्षिणेतून एक छानदार हिरवा पाषाण येतो. पाषाण म्हणजे दगड आणि असे चकचकीत निळे खडे मिळवण्यासाठी प्रवाशांचे तांडे, धोक्याचे मार्ग पत्करून खूप उत्तरेला (अफगाणिस्तानात) जातात. डोंगराच्या पलीकडे. तिथे



भलीमोठी अस्वलं आणि दुसरीही रानटी जनावरं असतात म्हणे!"

पण कपर्दी स्वतः आपल्या गलबतातून जो दूर दूर जाई तो दुसऱ्याच एका नदी खोऱ्यात. (युफ्रेटिस-तैग्रीस) तिथूनच उत्तम खजूर येई. तिथल्या शहरांतून विटांची घरे असत. आणि तो सांगायचा, आणखी पुढे गेले की तिसरे एक नदीखोरे लागे. तिथे असेच सुधारलेले लोक (मिसरी किंवा ईजिप्शियन) राहात. त्यांची घरे असत दगडांची. त्यांची शहरे नि खेडी नीलस नदीच्या काठाशी असत, पण ज्या दगडी स्मारकांसाठी तो प्रदेश प्रसिद्ध होता ती मात्र आणखी दूरवर वाळवंटात बांधलेली होती.

"ती शहरे आपल्याहून सुंदर आहेत का हो?" झेबरच्या स्वरात काळजी उमटली होती.

कापर्दी हासला. "हे बघ काही गोष्टी त्यांच्याजवळ आहेत. दुसऱ्या काही गोष्टी आपल्याजवळ आहेत." तो म्हणाला. "पण तुला एक सांगतो. मी कुठच्याही सफरी-वरनं परत आलो की आधी धाव घेतो आपल्या सार्वजनिक न्हाणीघराकडे. तिथे गरम पाण्याने आंघोळ करायला जी मजा येते. ती दुसरीकडे कुठेही मिळत नाही."

"म्हणजे? दुसऱ्या देशातले लोक आंघोळी करीत नाहीत?" झंझारने विचारले.

"प्रत्येक घरात न्हाणीघर नसतं त्यांच्याकडे. आणि आपल्यासारखी झकास सार्व-जनिक न्हाणीघरं तर कुठेच नाहीत" हिरापने ऐटीत सांगितले. कपर्दीने आणखी खुलासा केला केला. तो म्हणाला, "आपल्याकडे जसे सांडपाणी वाहून नेण्यासाठी जमिनीच्या खालनं विटांचे नळ नि नाले नेलेले आहेत तसेही त्यांच्याकडे नसतात. त्यामुळे आपले रस्ते किती स्वच्छ राहतात! जुळ्या नदीच्या शहरातले लोक विटांचे उंच उंच मनोरे बांधतात आणि त्यांच्या शिखरांवर बसून तारे बघतात. नील नदीच्या देशात दगडाची अवाढव्य स्मारकं वाळवंटातल्या रेतीतून वर डोकी काढीत असतात. वाटतं की ही कधी नष्ट होणारच नाहीत. पण उत्तम आखलेली शहरं म्हणाल तर आपल्यासारखी कुठेच नाहीत. आपलं मोहेंजोदारो शहर जगातलं अत्यंत स्वच्छ शहर आहे. आणि त्याची रचना सर्वोत्कृष्ट आहे."

## भीमक आणि त्याचे मित्र

आता आपण पुराणकाळात आलो. या काळात घडलेल्या प्रसंगांचे वर्णन आपले महाकाव्य जे महाभारत त्यात केलेले आहे. मोहेंजोदारोतल्या नगरवासीयांची आणि त्यांच्याही पूर्वीच्या सिंधू खोऱ्यातल्या संस्कृतीची जागा आता भटक्या लोकांनी घेतली आहे. हे लोक म्हणजे कुरणावर उपजीविका करणारे आर्य. ते गुरे पाळीत, गुरांचे कळप घेऊन भटकत. धान्यही पेरीत.

यमुनानदीच्या तीरावरची 'वारणावत' भूमी म्हणजे भरपूर पाण्याचा, छायावृक्षांनी गजबजलेल्या अरण्यांचा नि भरघोस कुरणांचा प्रदेश. इथे रानाच्या शिवेवर एक खेडेगाव होते. त्यात तिथल्या झोपड्या होत्या चिखल, बांबू, आणि कुडाच्या. अगदी ओळीने बांधलेल्या. सभोवार काटेरी कुंपण असलेल्या. इथे आपली आई नि छोटी



बहीण यांच्यासह एका सारथ्याचा मुलगा राहात असे. भीमक त्याचे नाव. त्याचे वडील कुरुक्षेत्रावर झालेल्या भयंकर लढाईत मारले गेले होते.

इतर मंडळींप्रमाणे भीमक पहाटे उठायचा. तो धनुर्विद्या शिकत होता. त्याच्या बहुतेक सोबत्यांपेक्षा त्याची बाणाची नेमबाजी सरस होती. थोड्याच वर्षांत तो रथ हाकायला शिकणार होता. रथ तयार करायला देखील. आपल्या बाबांच्या पावलावर पाऊल टाकून आपण राजाचा एक उत्कृष्ट सारथी बनावे अशी त्याची इच्छा होती.

सूर्य डोक्यावर येईपर्यंत सकाळचे काम आटोपले होते. भीमकने नदीत आंघोळ केली आणि तो जेवणासाठी घरी आला. मग आपल्या मित्रांबरोबर खेळण्यासाठी तो रानात जायला निघाला. त्याचे मित्र म्हणजे गुराखी पोरे आणि कुंभार, कोष्टी नि सोनार यांचे मुलगे. सर्व मिळून लुटूपुटीच्या लढाया खेळले. सदासर्वकाळ भीमकच पुढारी बनला. कारण त्याच्या वडिलांना लढाईतच मरण आले होते ना! त्याने आपल्या सैन्याची निरनिराळ्या तऱ्हेने रचना केली. कधी चौकोन, कधी लांबट चौकोन तर कधी जसे काही कोळ्याचे जाळें. कधी कधी दोरीच्या शिड्या, गोफण नि परशू लढाईतले कुऱ्हाडीसारखे हत्यार—वापरून त्यांनी शत्रूला वेढाही दिला.

या खेळांसाठी लागणारी स्वतःची हत्यारे स्वतः बनवणे भीमकाला फार आवडे. लांबलचक काठयांना सुंदर रोगण फासून, टोके करून ते तो भाले म्हणून वापरी. आखूड जाड दंडुके घेऊन, त्यांना तो धार केलेले दगड जोडी. म्हणजे परशू तयार होई. परशू हे त्याचे आवडते हत्यार होते. आणि दगडी पाते दंडुक्याला चामडी पट्ट्याने बांधताना तो फार काळजी घेई. चामडे जसजसे आवळले जाई तसतशी चामड्याची पकड घट्ट होत जाई.

कधी कधी काळ्या रंगाचे ठेंगणे दस्यू मुलगे तिथे येत; आणि मग या लुटूपुटीच्या लढायांना गंभीर वळण लागे. उंच नि गोऱ्यापान आर्यांपासून दस्यू दूर वेगळे राहात. त्यांना आर्यांनी जिंकले होते. रानाच्या अगदी आत कुठेतरी त्यांच्या छोट्या वस्त्या असत. हे दोन्ही गट कधीकधी आपसात लढत खरे, पण एरवी ते एकत्र खेळत.



भीमकाने आपले जवाच्या पिठाचे लाडू मटकावले. तो दूध प्याला. आईने विचारले, “आज एवढी गडबड कसली रे ?”

“देवदत्त आलाय ना ? कित्ती दिवस झाले आमची त्याची भेट झाल्याला !” भीमकाने उत्तर दिले.

“हं ! हं !” आई म्हणाली, “गुरु देवमित्र शाकल्यांचा चेला म्हणून देवदत्त आश्रमात शिकायला राहिला होता, नाही का ? चार वर्षं झाली की तो गेला त्याला. आता चांगला विद्वान झाला असेल.”

भीमक खेदाने म्हणाला, “तो आश्रमात गेला हे वाईट झालं. तो एक उत्तम योद्धा होता आमच्यांतला !

त्याची आई हसली, “जा, पळ ! पण उशीर करू नकोस, हं !” असे म्हणून ती थाळ्या धुवायला गेली.

पण त्याची छोटी बहीण देवी मोठी चौकस मुलगी. तिने विचारले, “हे लगळे भाले नि काठ्या कशाला घेतो आहेस रे बरोबर ?”

“आम्ही मोठी लढाई लढणार आहोत.” भीमक म्हणाला, “कुरुक्षेत्रावर झालेलं प्रसिद्ध महायुद्ध माहीत आहे ना तुला ? युधिष्ठिर महाराजांनी नि त्यांच्या भावांनी आपल्या दुष्ट चुलतभावांचा, कौरवांचा पराभव केला ती लढाई ? तसली आम्ही खेळणार आहोत. आणि आमचं खूप मोठं गजदळ असेल. धेनुकाच्या गाई म्हणजे आमचे हत्ती. दस्यू मुलगे कौरव होतील आणि रथ नि घोडेस्वार हत्तींचं सैन्य कापीत कसे घुसू शकतात ते दाखवून देईन मी त्यांना !”

“पण ही लढाई होणार आहे तरी कुठे ?” देवीने विचारले. तिची उत्सुकता आता







चांगलीच जागी झाली होती.

“वारणावतचे जुने अवशेष आहेत ना—जिथे खोटारड्या कौरवांनी पांडवांसाठी एक राजवाडा बांधला होता—तिथे आम्ही आमची सभा घेणार आहोत. त्या जन्या वाड्याच्या भिंती बाहेरून रंगीत दगडाच्या होत्या, पण आतून भिंतींना लाखेचं रोगण दिलेलं होतं. लाख पटकन पेटते. पण पांडवांना शंका आली की इथे काही-तरी काळंबेरं आहे. मग अंधार पडल्याबरोबर ते वाड्या-तून सटकले. त्याच रात्री भयंकर आग भडकून तो सबंध वाडा जळून खाक झाला. काही दगड उरले आहेत त्यांच्यावर गवत आणि झाडझाडोरा वाढला आहे. पण बाकी सबंध जमीन कशी सपाट आहे. भली मोठी लढाई खेळायला झकास जागा ! झाडाच्या ढोलीत माझी शस्त्रं आहेत. ती घेणार आणि आम्ही जाणार तिकडे.”

“मी पण येणार !” देवीने सूर काढला.

“महायुद्धात लहान मुलींचं काम नसतं !” भीमक म्हणाला आणि धूम पळाला.

देवी जराशी रडली. मग आपले अश्रू पुसून तिने कळशी घेतली आणि ती ओढ्यावर पाणी भरायला गेली. ओढ्याकाठी एक उंच पांढरा करकोचा उभा होता. त्याच्याकडे पाहात ती जरा वेळ उभी राहिली आणि मग खूप उशीरा आली.

तिची आई तिच्यावर चिडली. म्हणाली, “आलीस का एकदाची ? तुझी मावशी आजारी आहे तिच्याकडे जायचं आहे मला, तू शेजारच्या हरितीबरोबर खेळ. मी घरी आले की तुला हाक मारीन.”

देवीने ते मुकाट्याने कबूल केले. पण ती आपल्याशीच म्हणाली, 'मी नाही जाणार शेजारी. मी जाईन वारणावताच्या मैदानावर.'

आणि देवी निघालीसुद्धा रानातून तिकडे जायला. आर्य मुलांना रानटी जनावरांची भीती वाटत नसे. आपल्या भावाच्या आधी तीच पोचली मैदानावर. कारण भीमक आधी आपल्या हत्यारखान्याकडे म्हणजे वडाच्या झाडाकडे गेला होता.

तिथून पुढे तो आपल्या मित्रांना भेटला. कोष्टयाचा मुलगा कलाधन, कुंभाराचा मुलगा अलीक आणि सोनार कुटुंबातला जयंत. गुराख्याचा पोर धेनुक त्यांना नंतर भेटणार होता. मिळतील तेवढी गुरे गोळा करून तो थेट पडक्या वाड्याच्या मैदानावरच त्यांना भेटणार होता.

आणि मग देवदत्त आला. सर्वांनी आनंदाने आरोळ्या ठोकून त्याचे स्वागत केले. त्याच्यावर प्रश्नांचा मारा केला.

"काय शिकतोस रे तिकडे तू?" "शास्त्री झालास की नाही तू आता?" "तुला मित्र कोण कोण मिळालेत?" "जुन्या मित्रांना तर विसरला नाहीस ना?" एकामागून एक धडाधड प्रश्न.

देवदत्त खूप प्रेमाने वागला, पण पूर्वीपेक्षा जास्त गंभीर नि विचारी बनला होता. "सध्या मी चारी वेदांचा अभ्यास करतो आहे." तो म्हणाला. "आणखी आठ वर्षं मला गुरुजींजवळ राहावं लागेल, खूप शिकावं लागेल, तेव्हा कुठे मी शास्त्रात पारंगत होईन."

"किती हुशार आहेस रे!" अलीक म्हणाला. "माझ्या फुसक्या डोक्यात एवढं ज्ञान मावायचंच नाही."

"तुझी ताकद पण वाढलेली दिसते!" भीमक म्हणाला. "माझ्यापेक्षाही तुझे हात बळकट दिसताहेत." आपल्या मित्राच्या देहाचे स्नायू चाचपीत तो खेदाने म्हणाला, "शिकारी किंवा सारथी किती उत्तम झाला असतास!"

"मला कुस्त्यांचा खूप सराव आहे." देवदत्त हसून म्हणाला. "शिकारीविषयी म्हणशील तर आमचा आश्रमच दाट अरण्यात आहे. तिथे रानटी पशू कितीतरी असतात."



"देवदत्त, इथलं तुला काय माहीत आहे? कौरव मेल्यानंतर आपल्या महाराजांनी केवढी सुंदर राजधानी वसवली आहे!" जयंत सांगू लागला. इंद्रप्रस्थाच्या वैभवाचे वर्णन करायचे त्याला विलक्षण वेड. "शहराभोवती मजबूत तट आहे, खोल खंदक आहेत, उंच उंच बुरुज आहेत. बुरुजावर उभे राहून सैनिक पहारा करीत असतात. तिथून जवळच्याच खेड्यात माझे मामा राहातात. ते नेहमी राजधानीला जातात. तिथे ते दागिने विकतात, गळयातल्या जड सरी, माळा नि बांगड्या. तसंच बायकांसाठी नि पुरुषांसाठी पण कानातली कुंडलं! शहरात बघण्यासारखं काय काय आहे; राजाचा राजवाडा, रानटी पशूंसाठी एक मोठं मैदान, न्यायालय आणि द्यूतमंदिर!"

"द्यूत....जुगार?" देवदत्त म्हणाला, "हुं:! जुगारापायी भोगलेलं दुःख पुरेसं झालं नाही वाटतं?"

कलाधन म्हणाला, "एकंदरीत असं दिसतं, की राजे, राजपुत्र सरदार यांचं शिकार किंवा जुगार खेळल्यावाचून चालतच नाही. आता लढाई संपली आहे आणि राजे लोकांनी केलेल्या शिकारींमुळे रानावनात राहणारांचं जीवनही सुरक्षित झालेलं आहे. एके काळी चित्ते नि तरस इतके धीट झाले होते की खेडयातल्या मुलांना ते चक्क उचलून नेत. आता अधूनमधून गुरं पळवतात. पण माणसं नाही."

भीमकाने वर मान करून सूर्याकडे पाहिले. तेच त्यांचे घड्याळ. तो म्हणाला, "चला महायुद्धावर गेलं पाहिजे. धेनुकाने पडक्या मैदानावर गुरे आणली असतील."



"आता देवदत्त आश्रमातला शिष्य झालाय, तो सैनिक होऊ शकत नाही." जयंत म्हणाला.

"अं! राजाबरोबर पुरोहित पण येतोच की युद्धावर!" भीमक म्हणाला. "भगवान कृष्ण अर्जुनाचे सारथी बनले होते. देवदत्ता तू माझा सारथी होशील?"

"होईन की!" देवदत्त शांतपणे हसत म्हणाला.

"तुला शस्त्र कोणतं हवं? पहिली निवड तुझी!" अलीक म्हणाला. "भीमकाने काही छानदार भाले केले आहेत. आणि परशू नि धनुष्य पण!" आणि वडाच्या झाडाला एक खोल ढोली होती तीत हात घालून त्याने ती सगळी शस्त्रे काढली.

"वा: ! चांगलीच ऐटबाज आहेत!" देवदत्त म्हणाला. "पण मला परशू किंवा गोफण किंवा धनुष्य नको. पुरोहित लढत नाही. शिवाय माझ्याजवळ माझी काठी आहे. ती पुरेल."

मुलांनी त्याची काठी तपासून पाहिली. चांगलीच मजबूत नि जड होती ती आणि तिला टणक, टोकदार बोथी होती.

पडक्या मैदानावर ही मंडळी पोचली तेव्हा धेनुकाने गुरांना आधीच नीट रांगेत उभे केले होते. काय भयंकर दिसत होती ती पशुसेना! भारताच्या अरण्यातली त्या सुरवातीच्या काळातली गुरे ती! अर्धवट रानटी नि धिप्पाड; प्रत्येकाच्या पाठीवर एकेक माहूत—एकेक छोटा काळा दस्यू मुलगा बसलेला होता. धेनुकाने या मुलांना या लुटूपुटीच्या लढाईत भाग घेण्यासाठी बोलावले होते.

भीमकाचा पक्ष आलेला दिसताच त्यांनी एक जोरदार आरोळी ठोकली, आणि आपापल्या हत्तींना टोकरून पुढे दामटले. पांडवांनी हल्ला चढवला. कारण ते रथातून आले होते असे समजायचे. आपले भाले डोक्यावर उंच उगारून ते गर्जना करीत दौडत आले. गुरांचा कळप ते जवळ येईपर्यंत गप्प उभा होता. मग एकदम दुभंगला. म्हणजे दोन बाजूंनी गुरे दोन बाजूला झाली. मधल्या वाटेतून पांडव घुसले. सारी गुरे उधळली आणि मोकाट धावत सुटली. रथींनी गजदळाचा पाडाव केला होता. ते फळी फुटून गोंधळून सगळ्याभर पांगले होते.

अचानक गुरांच्या हंबरड्यातून नि पळापळीतून एक कर्कश दुःखपूर्ण किंकाळी ऐकू आली. एक गाय भरकटत दूर गेली होती आणि तिथे दबून बसलेल्या चित्त्याने तिच्यावर झडप घातली होती. पण हे मुलगे रानात राहणारे होते. रानपशूंच्या त्रासाला तोंड द्यायची त्यांना सवय होती. आपल्या बहुमोल गुरांचे रक्षण करण्याइतके धैर्य त्यांच्यात होते. ते सर्वजण मोठमोठ्याने ओरडत चित्त्याच्या अंगावर धावले आणि धेनुकाने त्याच्यावर पुन्हा पुन्हा वार करायला सुरवात केली. इकडे कळपाचा पुढारी जो बैल होता तोही मागे वळून चित्त्यावर तुटून पडला. त्याला वाट करून देण्यासाठी मुले नि दुसरी गुरे घाईघाईने बाजूला झाली. मुसंडी मारून आलेल्या ह्या बैलाच्या वाटेतून धेनुक उडी मारून बाजूला होत आहे तोच चित्ता भिऊन बाजूला उडी मारून पळाला आणि झुडपात दिसेनासा झाला.

मुलांनी विजयाची गर्जना केली. पण त्याच वेळी एकाएकी एक किंकाळी त्यांच्या कानात शिरली. दुबळी पण कर्कश किंकाळी. ती ऐकून मुलांचे रक्त गोठल्यागत झाले. विशेषतः भीमकाचे. लहान मुलीचे ओरडणे होते ते आणि त्याने आपल्या बहिणीचा आवाज ओळखला होता.




## चित्त्याच्या जबड्यातून सोडवले!

देवी गवतात लपून बसली होती. तिथून सारा प्रकार पाहात होती. ती बाहेर पडणार तेवढ्यात चित्त्याने तिला पाहिले आणि तो तिच्या अंगावर उडी मारणार तोच भीमक नि धेनुक तिथे धावून आले होते. दुसरे मुलगेही पाठोपाठ आले, पण मुलीचे प्राण वाचणे शक्य नाही असेच त्यांना वाटत होते. चित्त्यावर जर मागून हल्ला केला तर त्याचा जबडा लगेच मिटेल आणि त्यात देवी चिरडेल ही भीती होती.

पण देवदत्त पुढे धावला. त्याची लांबलचक भक्कम काठी उंच उगारलेली होती. देवीच्या खांद्याभोवती चित्त्याचा जबडा मिटतो आहे तोच देवदत्ताने काठी त्याच्या घशात खुपसली.

देवीच्या खांद्यावर तांबडे लाल रक्त भुळकन् आले. चित्त्याची शेपटी खाली पडली.



शरीर थडथडले आणि निष्प्राण होऊन पडले. देवीने किंकाळी फोडली. पण ती भीतीने, वेदनेमुळे नाही.

"लागलं का ग तुला? लागलं का?" भीमकाने काळजीच्या सुरात विचारले.

"मला माहीत नाही" देवीने कापत उत्तर दिले आणि ती रडत सुटली.



हे प्रकरण आता देवदत्ताने स्वतःकडे घेतले. तो म्हणाला, "हे बघ, मला माहीत आहे तुला लागलेलं नाही. चित्त्याचं रक्त तुझ्या अंगावर सांडलेलं आहे, कारण विजय तुझा झालेला आहे. तुझ्या पराभूत शत्रूकडे अभिमानाने बघ. तुझा भाला हालव त्याच्याकडे पाहून." आणि एक लहानशी काठी त्याने तिच्या हातात दिली.

देवीचे अश्रू सुकले. हळूच हसून तिने थरथरत्या हाताने काठी हालवली. "हे माझं रक्त आहे की चित्त्याचं?" तिने जरा संशयाने विचारले.

"चल आपण त्या तळ्याकडे जाऊ आणि धुवून टाकू म्हणजे तुझं तुलाच कळेल" देवदत्त म्हणाला.

सगळीजणे तळ्याकडे गेली. आणि देवीने रक्त धुवून टाकले. आता जेव्हा भीमकाची खात्री झाली की आपल्या बहिणीला काहीसुद्धा इजा झालेली नाही तेव्हा तो तिला रागे भरू लागला. झाले! पुन्हा तिने रडायला सुरवात केली.

देवदत्त मध्ये पडला. तो म्हणाला, "मला वाटतं, आपण हिला आणखी रागवू नये. चित्त्याच्या जबड्यात ती सापडली होती. तेवढा धडा तिला बस्स आहे. आता पुन्हा एकटी जायची नाहीस ना देवी?"

"नाही, नाही, वचन देते!" देवी म्हणाली. आणि मेलेल्या चित्त्याकडे परत जात असताना तिने देवदत्ताचा हात घट्ट धरला होता.

दस्यू मुलांची घरे जवळच होती. त्यांनी तेवढ्यात धावत जाऊन चाकू आणले, चित्त्याचे कातडे सोलण्यासाठी. या कामात ते खास तरबेज होते.



दुसरे मुलगेही आता चित्त्याभोवती जमले. देवदत्ताकडे ते कौतुकाने पाहू लागले. "काय वार केलान् पण!" ते म्हणत होते. "आश्रमात तुला हे शिकवतात का रे?" "आपण सगळेच तिकडे जाऊन शिकू या का?"

देवदत्ताच्या चेहऱ्यावर पुन्हा शांत हसू उमटले. तो म्हणाला, "आमच्या गुरुजींनी एका शिष्याला अस्वलापासून वाचवलेलं मी पाहिलंय्! तो वार अगदी असाच होता."

"आपण याचं कातडं सोलू आणि मग ते तू वापर या पराक्रमाचं बक्षीस म्हणून!" धेनुक म्हणाला.

"धेनुका, आधी तुझ्या गाईकडे पाहू या" देवदत्त म्हणाला. त्याने देवीपुढे हात केला. कारण मेलेल्या चित्त्याला पाहून ती पुन्हा थरथर कापत होती. "ये बाळ," तो म्हणाला, "आपण जाऊन त्या बिचाऱ्या गाईची काळजी घेऊ या, चित्त्याच्या नखांनी नि दातांनी तुझ्यापेक्षा तिला जास्त लागलेलं आहे."

गाय अजूनही केविलवाणे हंबरत होती. त्या ओरडण्यात जखमेचे दुःख होते तशीच भीती पण होती. देवदत्ताने तिला थोपटले, गोंजारले; तिला त्याने पाण्याकडे नेले, आणि हळुवार हातांनी तिची जखम धुतली. तिची कातडी फाटलेली होती, रक्त वहात होते; पण जखमा खोल नव्हत्या.

"आपण हिच्या पाठीवर दूधपाला लावू या म्हणजे दुःख कमी होईल." देवदत्त म्हणाला. देवीने जाऊन रुईचे झाड शोधून काढले. त्याची मोठाली पाने कापून



त्यांनी गाईच्या पाठीवर गवताच्या पात्याने बांधली. मग त्यांनी तिला ताज्या लुसलुशीत गवताच्या एका कुरणाकडे नेले आणि लौकरच ती मजेत रवंथ करू लागली.

"देवदत्ता, तू शिकारी आहेस तसाच गुराखी पण चांगला दिसतोस" धेनुक त्याचे कौतुक करीत म्हणाला. "तू गुरांची देखभाल माझ्याइतकीच चांगली करतोस."

"आमच्या आश्रमात गुरांचा मोठा कळप आहे." देवदत्त म्हणाला. "अणि आम्हाला डोळ्यात तेल घालून त्यांचं रक्षण करावं लागतं. कारण चराऊ रानं दूर आहेत. आणि जंगल इथल्यापेक्षा दाट आणि भयंकर आहे."

"आश्रमात तुम्ही खाता काय?" जयंताने विचारले. या लठ्ठंभारती जयंताला स्वतःच्या आणि इतरांच्याही खाण्यापिण्याबद्दल नेहमीच उत्सुकता असे.

"दुसरी सगळीजणं खातात तेच आम्ही पण खातो." देवदत्त म्हणाला "भात, गहू, जव, दूध नि मांस पण इतर पदार्थांपेक्षा मांस आम्ही कमी खातो."

"तुला एवढी शक्ती आली ती दुधाने असणार!" अलीक म्हणाला. "दूध, तूप, लोणी नि दहीपण खूप असतं आमच्याकडे, पण आमच्याकडे तुमच्यापेक्षा उपासाचे दिवसही जास्त असतात." देवदत्ताने सांगितले, "आम्ही अंगमेहनतीचं, कष्टाचं जीवन जगतो ना, त्यामुळे शक्ती येते अंगात!"

एकाएकी देवीला हुडहुडी नि ताप भरल्यासारखे झाले. "हिला आपण हिच्या आईकडे पोचवून देऊ या." देवदत्त म्हणाला.

चित्त्याने गाईची पाठ फाडली होती पण गाय ते विसरलीसुद्धा. देवीला मात्र तो खांद्यावर मिटणारा चित्त्याचा जबडा अजून आठवतो आहे.

"पशूंपेक्षा माणसाला दीर्घकाळ आठवण राहते." देवदत्त म्हणाला.

जयंताने एक केळीचे पान तोडून आणले होते. त्यांत लाडवांची मोठी पुडी बांधून धेनुकाने दस्यू मुलांना दिली. त्यांनी धेनुकाला वचन दिले की चित्त्याच्या प्रेतावर तुटून पडण्यासाठी तरसे आणि कोल्हे येतील त्याच्या आधी आपण त्याचे कातडे सोलू आणि ते जपून ठेवू.



आणि मग प्रत्येकजण घरोघर गेला. भीमक, अलीक नि देवदत्त यांनी आळी पाळीने देवीला कडेवर घेतले. कारण या साऱ्या गडबडीचा नि पायपिटीचा तिच्यावर परिणाम होऊन ती आता पेंगायला लागली होती. भीमकाची आई परत येण्याच्या जेमतेम आधी त्यांनी देवीला घरी नेले.

देवी आपल्या चटईवर पडली आणि झोपी गेली. भीमकाची आई घरात आली, तिने आपल्या मुलाच्या मित्राचे स्वागत केले आणि त्याला आश्रमातल्या जीवनाबद्दल विचारले. देवदत्ताने शांतपणे देवीला चित्त्याशी कशी झटापट करावी लागली ते सांगितले. "देवी पुन्हा कधी एकटी जायची नाही" तो शेवटी म्हणाला.

देवी जागी झाली होती आणि सारे लक्ष देऊन ऐकत होती. तिने आईकडे मोठाल्या भेदरलेल्या डोळ्यांनी पाहिले. आईने तिला उचलले आणि घट्ट पोटाशी धरले. आईने आपल्याला क्षमा केली हे देवीने ओळखले.

आता तिची दोन्ही प्रकारची भीती पळाली होती. चित्त्याची आणि आई शिक्षा करील ही भीती. त्यामुळे ती त्यांच्या संभाषणात सामील झाली. "धेनुक उद्या चित्त्याचं कातडं आणील. तो नि दस्यू मुलं ते सोलणार आहेत" ती पेंगत पेंगत म्हणाली.



"तुम्हाला आवडेल का ते चामडं ठेवून घ्यायला?" देवदत्ताने भीमकाच्या आईला विचारले. "रात्रीचं बरं—ऊब वाटेल."

"नको रे बाबा. विचारलंस तेवढं पुरे! त्या चामड्याने मला स्वप्नं पडतील वाईट साईट." मग तिने विचारले, "किती दिवस राहायचा आहेस इथे, देवदत्ता?"

"माझे गुरुजी देवमित्र शाकल्य आश्रमात परत येईस्तो मी इथे राहणार आहे त्यांना इंद्रप्रस्थाहून बोलावणं आलं आहे. तिथे युधिष्ठिर महाराज लौकरच अश्वमेध यज्ञ करणार आहेत.

"तुम्हाला माहीत असेल की हा महायज्ञ ज्याची सत्ता जगभर मान्य झाली आहे अशाच राजाला फक्त करता येतो. यज्ञाच्या आधी एक खास घोडा सोडतात. वर्षभर त्याला भटकायला सोडलेलं असतं ज्या कुणाला राजाच्या सत्तेला आव्हान द्यायचं असेल त्याने तो घोडा पकडून दाखवावा! आता हा अश्वमेधातला घोडा सोडल्याला वर्ष होत आलं. सर्व राज्यांचा राजांनी धर्मराज (युधिष्ठिर महाराज) आपले सार्वभौम सम्राट आहेत हे मान्य केलं आहे. आता यज्ञ होण्याचं बाकी आहे. तो लौकरच मोठ्या थाटामाटात होईल. सर्व मुख्य मुख्य आश्रमांच्या आचार्यांना राजधानीत यांयचं आमंत्रण गेलं आहे. तसंच गंगा, यमुना, शोण, गंडक अशा महानद्यांच्या तीरावर तप करणारे पवित्र ऋषी-त्यांनाही बोलावलेलं आहे.

झोपेला आलेली देवी मध्येच म्हणाली, "मला झोप येणार आहे. पण त्याच्या आधी मला सांगू दे. देवदत्त फार चांगला आहे. त्याने किनई मला आणि गाईला खूपच मायेने वागवलं."

भीमक हसला. "देवदत्त आश्रमात वेद शिकून विद्वान होणार हे आम्हाला माहीत होते. पण तो उत्तम शिकारी नि गुराखीही होईल, तसंच लहान मुलांनाही सांभाळायला शिकेल ही कल्पना नव्हती."

"आश्रमात तो जे शिकतो ना, त्यालाच म्हणतात शहाणपण" भीमकाची आई मृदू स्वरात म्हणाली.


## पाटलिपुत्राच्या वाटेवर : धर्मशाळेत

पाटलिपुत्राच्या मार्गावरील एका धर्मशाळेत खूप गडबड उडाली होती. कारण पूर्वेकडून आलेला एक भला मोठा कारवान तिथे नुकताच उतरला होता. मौर्य कुळातला तिसरा व सर्वांत थोर सम्राट् अशोक तुम्हाला माहीत आहेच. त्याने प्रवाशांसाठी ज्या अनेक धर्मशाळा बांधल्या त्यांतली ही एक.

बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली सम्राट अशोकाने आपल्या अफाट साम्राज्यात अनेक सुधारणा केल्या. सगळ्याभर रस्त्यांचे जाळे विणून त्याने दूरदूरचे प्रांत एकमेकांना जोडून टाकले. राजा स्वतः आणि त्याचे अधिकारी वारंवार दौरे काढीत आणि प्रजेच्या कल्याणाकडे स्वतः लक्ष देत. व्यापारी आणि प्रवासी दूरदूर अगदी निर्भयपणे आणि आणि सुखाने हिंडत, प्रवास करीत. अरण्ये साफ करण्यात आली होती. नव्या वस्त्या तयार झाल्या होत्या. तिथे शहरातल्या किंवा गावातल्यासारखी चालीरीतींची बंधने कडक नव्हती.

धर्मशाळेच्या अधिरक्षकाचे कुटुंब म्हणजे जगू निरनिराळ्या भागांतून आलेल्या प्रतिनिधींचा मेळावा. स्वतः अधिरक्षक उत्तर भारतीय वाटे. तो होता मध्यमवयीन, उंच आणि ताठ, सैनिकासारखा. त्याची आई जरी म्हातारी आणि अंगाला सुरकुत्या पडलेली होती तरी तिची अंगकांती नि शरीराची ठेवण त्याच्याचसारखी होती. त्याची बायको आज जरा लहानसर आणि काळी होती. पण सर्वांत जास्त वेगवेगळेपण दिसायचे मुलांमध्ये. धाकटी दोन मुले—एक मुलगा नि एक तान्हेबाळ. दिसायला सारखी होती. पण सर्वांत मोठी होती मुलगी. ती मात्र काळी होती. केस काळे कुरळे नि ओठ जाड मोठाले.





टळटळीत दुपारची वेळ होती, पण धर्मशाळा खचून भरली होती. अंधार पडायच्या कितीतरी आधीच प्रवासी आसऱ्याला येत. कारण आसपासच्या रानात खूप वन्यपशू असत. ताम्रलिपीचा एक व्यापारी राजधानीच्या बाजाराला आलेला होता. मसाल्याच्या बरण्यांनी नि अत्तराच्या कुप्यांनी भरलेल्या बैलगाड्या त्याच्यापाशी होत्या. राजाचा एक तपासनीस—नोंदणी अधिकारीही तिथे उतरला होता, त्याच्या हाताखाली कितीतरी सहायक होते. आणखीही दोघे प्रवासी होते. एक होता खांद्यावर चित्त्याचे कातडे पांघरलेला योगी. तो सगळ्या तीर्थांची यात्रा करायला निघाला होता. आणि एक गौड (बंगाल) देशातला तरुण विद्यार्थी होता. दूर तक्षशिला विद्यापीठ होते तिकडे तो निघाला होता.

धर्मशाळेला लागून विहीर होती. तिच्यातल्या पाण्याने सर्व पाहुण्यांनी आंघोळी केल्या, पोटभर जेवण केले आणि मग सगळी अंगणात गप्पा मारीत बसली. रक्षक आणि त्यांची म्हातारी आईही त्यांच्यात सामील झाली. त्यांच्या गोष्टी उत्सुकतेने ऐकू लागली. व्यापारीबुवा पाटीलपुत्राच्या बाजाराचे, तिथे माल कसा मांडला जातो त्याचे वर्णन करीत होते. रक्षकीणबाई गडबडीने तिथून जात असताना त्यांच्या पतिराजांनी त्यांना हाक मारून म्हटले, "तुझी सासू बसली आहे. तू पण ये की! हे व्यापारी महाशय उत्तरेकडची चामडी, सतरंज्या, गालिचे, रंगीबेरंगी सुते, रेशीम, चाकूकात्र्या नि चिलखतं यांच्या गोष्टी करताहेत."

व्यापारीबुवा म्हणाले, "आणि हस्तिदंती वस्तू. सोन्याच्या माळी, सैपाकाचे मसाले, अत्तरं नि नट्टापट्टा करण्याच्या दुसऱ्या वस्तू."

"ही आलेच मी!" बाई म्हणाल्या. "आत्ताच आणखी एक पाहुणे आलेत. उत्तरेकडचे शिल्पकार आहेत म्हणे. खूप लांबून आलेत. त्यांना भूक लागली आहे."

कोपऱ्यात बसलेला एक म्हातारा मध्येच म्हणाला, "आपले महाराज स्वतः योद्धे आहेत. योद्धयांच्या कुळातला त्यांचा जन्म आहे. आणि तरी त्यांनी म्हणे युद्ध करायचं सोडून दिलं. अशाने शांतता टिकेल कशी?"

"पण टिकली आहे की शांतता!" व्यापाऱ्याने ठासून सांगितले. "परक्या शत्रूंपासून आपल्याला भीती नाही. कारण हल्ला करण्याची त्यांची हिंमत नाही. सैनिक आपापल्या घरी आहेत त्यामुळे पूर्वीसारखा, ते जातील तिथल्या लोकांना त्यांना पोसावं लागेल तोही त्रास नाही. चोरांपासून धोका नाही; कारण महाराजांचे शिपाई सगळीकडे सुव्यवस्था ठेवताहेत. अधिकाऱ्यांचं भय नाही; कारण आता ते स्वतः सगळे कायदे पाळतात आणि लोकांना पाळायला लावतात.

नोंदणी अधिकारी हसला, म्हणाला, "आणि आम्ही सगळ्या नोंदी इतक्या काळजीपूर्वक ठेवतो नि देखरेख इतकी डोळ्यात तेल घालून करतो की कुणी कुणाकडून जबरीने पैसे उकळण्याचा संभवच नसतो. महाराज वारंवार आपल्या अधिकाऱ्यांना सूचना देतात, की कायद्याचं पालन करा पण प्रेमाने धाकदपटशाने नको."

"पण महाराजांच्या आजोबांनी नि वडिलांनी जी एवढी सुरक्षा निर्माण केली आहे तिच्यावर आतून बाहेरून कुठूनही शत्रू हल्ला करू शकेल." म्हातारबुवा कुरकुरले.

आता जोगी मध्ये पडला. म्हणाला, "महाराज राज्य करतात ते धर्माच्या आधाराने. लोकांना भीती दाखवून नव्हे."

"सैन्य कमी केलं आहे असं नाही." नोंदणी अधिकारी म्हणाला. "सीमांवर चांगला पहारा असतो आणि कायद्याची अंमलबजावणी केली जाते."

जोगीबुवा म्हणाले, "आपल्या थोर सम्राटाने घोषणाच केली आहे, "धर्माचं आणि न्यायनीतीचं शिक्षण यापुढे रणदुंदुभीची जागा घेईल. नाहीतरी मनुष्याच्या हृदयावर मिळवलेला विजय तोच खरा विजय असतो."

"आणि म्हणूनच"....व्यापारी म्हणाला, "महाराजांनी आपले धर्मनियम खडकांत नि खांबांवर कोरून ठेवले आहेत. हेतू हा की सर्वांना आपली कर्तव्यं समजावीत आणि कायद्याची सत्ता टिकून राहावी. देशात जिकडेतिकडे महाराजांचे संदेश कोरलेले आढळतात.



“या लेखांमधून”—जोगी म्हणाला, “महाराजांनी सर्वांनाच त्यांचा धर्म किंवा कर्तव्य काय याविषयी सूचना दिल्या आहेत. राज्यपालांना, कनिष्ठ अधिकाऱ्यांना आणि जनतेला.”

व्यापाऱ्याने मध्येच जोगीबुवांना अडवीत विचारले, “बुवा, आमचे राजाधिराज तर पिवळ्या कफनीच्या भिक्षूंना मानणारे आहेत. तुम्ही तर त्या पंथाचे नाही. मग तुम्ही कशी त्यांची एवढी स्तुती करता?

याचे उत्तर नोंदणी अधिकाऱ्याने दिले, “महाराजांना सर्व धर्मीयांबद्दल आदर आहे. गौडदेशातले नामवंत पंडित उपगुप्त यांनी महाराजांना दीक्षा दिली आणि ते दयाघन बुद्धाचे अनुयायी बनले. पण प्रत्येक धर्मात काही ना काही चांगलं आहे असं महाराजांना वाटतं. धर्मामुळे माणसं एकमेकांजवळ यावीत, दुरावू नयेत अशी त्यांची इच्छा असते.”

जोगीबुवांनी टेकू देत म्हटले, “एका स्तंभावर महाराजांनी असं कोरलं आहे की दुसऱ्याच्या धर्मावर टीका करून आपल्या धर्माचा बडेजाव कुणी सांगू नये. महाराज नेहमी शिकवण देतात सौम्य वचन आणि सद्वर्तन यांची. आणि महाराज जी शिकवण देतात ती स्वतः पाळतात.” अधिरक्षक म्हणाला. त्यांचं गोड बोलणं आणि चांगलं वागणं यामुळेच महाराज सर्वांना इतके आवडतात. पाषाणात कोरलेल्या त्यांच्या प्रवचनातले प्रेमळ शब्द आणि आपल्या सभोवती आढळणारी त्यांनी केलेली सत्कृत्यं यामुळे लोक त्यांच्यावर प्रेम करतात. तुम्हीच पहा ना—व्यापाऱ्यांसाठी नि वाटसरूंसाठी त्यांनी रस्ते बांधले; शेतकऱ्यांसाठी विहिरी कालवे खोदले; माणसांसाठी नि प्राण्यांसाठी रुग्णालये बांधली; रस्त्यांत दर आठ कोसांवर आता धर्मशाळा आहेत, त्यांत पाण्यासाठी विहिरी आहेत. धान्याची कोठारं आहेत. रस्त्याच्या दुतर्फा चिंचेची नि वडाची झाडं लावली आहेत. प्रवाशांना सावली मिळावी म्हणून प्रत्येक शहराच्या नि गावाच्या बाहेर आंबराया असतात. तिथे माणसांना आणि पशुपक्ष्यांनाही आसरा मिळतो, खायला प्यायला मिळतं.”





त्याच वेळी अधिरक्षकीणबाईंनी नव्या प्रवाशाला आत आणले. गृहस्थ उंचनिंच, मोठाड चेहऱ्याचा होता. विनोदी आणि प्रेमळ दिसत होता. बाई कोपऱ्यात म्हातारीजवळ बसल्या आणि यजमानांना म्हणाल्या, “बिंबी पाहते आहे प्राण्यांकडे. ते आटपलं की येईलच.”

नवे पाहुणे म्हणाले, “माझ्या प्राण्यांना काय हवं नको ते बहुधा मीच पाहतो. पण त्या चिमुरड्या पोरीने त्यांना इतकं एखाद्या जाणकाराप्रमाणे खाऊ पिऊ घातलेलं मी बघितलं तेव्हा मी आलो तुमच्यांत निघून.”

“माझ्या मुलीला प्राण्यांचं फार प्रेम आहे” अधिरक्षक म्हणाला.

“ती काळ्या केसांची पोर तुमची मुलगी का?” व्यापाऱ्याने आश्चर्याने विचारले.

“हो, आमची मुलगी” अधिरक्षकाने ठासून उत्तर दिले.

पाहुण्यांनी परस्परांकडे आश्चर्याने पाहिले. कारण ती काळीसावळी मुलगी रानटी वाटत होती.

पण आता नवीन आलेल्या पाहुण्याने शहाणपणाने संभाषणाला वेगळेच वळण दिले. तो म्हणाला, “माझ्या घरच्या मंडळींना भेटल्याला मला खूप दिवस झाले.



आता पुन्हा मी उत्तरेला जाईन तेव्हा माझी पोर या तुमच्या मुलीएवढीच झालेली असेल. मला ती ओळखणारसुद्धा नाही."

अधिरक्षकीणबाई पुरुषांच्या संभाषणात सहसा पडत नसत. पण आता त्या हलक्या आवाजात म्हणाल्या, "महाशय, आपण आमची भाषा जरी उत्तम बोलता तरी आपण परदेशचे असाल असं मला वाटलंच होतं. बायकामुलं कुठे असतात आपली?"

"मी इराणी आहे" तो गृहस्थ म्हणाला, "पण आलो तक्षशिलेहून. तुमचे महाराज बऱ्याच वर्षांनी तक्षशिलेला आले होते, तेव्हा तिथल्या इराणी शिल्पकारांची वस्ती त्यांनी पाहिली. नंतर त्यांनी आमच्यापैकी काहींना मुद्दाम बोलावून घेतलं, दगडात शिल्प कोरण्यासाठी."

"महाराजांनी दगडांमधून आपल्या ज्या आज्ञा कोरून ठेवल्या आहेत त्याबद्दलच आम्ही आत्ता बोलत होतो" व्यापारी म्हणाला. "हे धर्माज्ञेचे स्तंभ कसे कापतात, कोरतात, वगैरे माहिती तुम्हीच आम्हाला सांगू शकाल. या महाराजापूर्वी दगडावर लेख कोरून प्रजेला आज्ञा देणार, राजा कुणी झाला नव्हता!"

"मी ज्या देशातून आलो तिकडे दगडांवर लेख कोरणं माहीत नाही, असं नाही." इराणी पाहुणे म्हणाले, "आमचा महान राजा डरायस—याने पण एका उत्तुंग खडकावर शिलालेख कोरून ठेवला आहे."

"काय लिहिलंय त्यात?" जोगीबुवांनी विचारले.

"डरायस बादशहाला मिळालेले विजय आणि त्यांचं ऐश्वर्य यांची त्यात यादी आहे."

"आमच्या महाराजांचे शिलालेख त्यांची स्वतःची थोरवी गाणारे नाहीत. प्रजेचं कल्याण त्यात लिहिलेलं आहे." जोगीबुवांनी उत्तर दिलं, "महाराज लोकांना सांगतात—तुम्ही सुखी व्हावंत अशी माझी इच्छा आहे. सुख मिळतं धर्माचं पालन करून. मृदुपणा, औदार्य, सत्यवादीपणा अंगी असला, वृद्धांबद्दल आदर बाळगला, आणि ब्राह्मण व भिक्षू तसंच गरीबगुरीब, हीनदीन यांना योग्यपणे वागवलं म्हणजे सुख लाभतं."





नोंदणी अधिकारी आणखी म्हणला, "आपल्या अधिकाऱ्यांना महाराजांच्या अशा सूचना असतात की एखादी विश्वासू दाई मुलांना जशी काळजीपूर्वक संभाळते तसं तुम्ही करा. माझ्या प्रजेच्या सुखाची नि कल्याणाची काळजी घेत जा. माहराजांची दयाबुद्धी शहरांच्या नि गावांच्या सीमेपार राहणाऱ्या अरण्यवासी लोकांपर्यंत पोचली आहे. सुधारलेले लोक ज्यांचा तिरस्कार नि छळ करतात अशा त्या दुर्दैवी लोकांबद्दलही त्यांना माया वाटते."

हे शब्द ऐकून अधिरक्षकीणबाईंचे डोळे पाण्याने डबडबले आणि तिच्या सासूने तिचा हात सहानुभूतीने दाबला. मग आजीबाई कोपऱ्यात बसल्या होत्या तिथून बोलल्या, "पण महाशय, हे शब्द लोकांना कळतात कसे? आम्हाला सगळ्यांना कुठे वाचता येतंय? त्यातून शिवेबरच्या लोकांना तर नाहीच!"

"हे शिलालेख विद्वानांच्या भाषेत लिहिलेले नाहीत. लोकांच्या भाषेत आहेत ते" व्यापारी म्हणाला.

"आणि राजाचे अधिकारी पुष्कळदा त्या त्या ठिकाणच्या लोकांना गोळा करतात आणि त्यांना राजाचे आदेश वाचून दाखवतात" नोंदणी अधिकारी म्हणाला. "पण आपले नवे मित्र आले आहेत, त्यांना आपण त्या प्रचंड

खांबांचे दगड कापतात कसे, कोरतात कसे हे विचारून घेऊया."

शिल्पकार सांगू लागला, "हा दगड दोन ठिकाणांहून येतो. मथुरेजवळ लाल –सफेत ठिपक्यांचा वाळूचा दगड सापडतो. आणि वाराणशीजवळ चुनार नावाचं ठिकाण आहे तिथे असाच पण टणक वाळूचा सापडतो—तपरी रंगाचा. स्तंभासाठी म्हणजे खांबासाठी भला जंगी लांबट दगड हवा, अखंड. तसा निवडून तो कापतात. त्याला आकार देतात. त्यावर कोरीवकाम करतात. त्याला गुळगुळीत रोगण देतात. या सगळ्या कामात अनेक पाथरवट गुंतलेले असतात. भारतीय आणि इराणी पण. नंतर नक्षीकाम. पाटलिपुत्राच्या राजवाड्यात कितीतरी खांबांचं मोठं दालन आहे पहा. त्या खांबावर फुलं नि वेलबुट्टी कोरलेली असते. तसं करण्याऐवजी आम्ही काय करतो? खांबावर बसण्याकरता भलेमोठे गोल माथे तयार करण्यासाठी आमचं सगळं कौशल्य खर्ची घालतो. आणि खांब घासून त्यांना इतकं लखलखीत रोगण चढवतो की ते धातूसारखे चकाकायला लागतात."

आमच्या भारतीय कारागीरांना हे रोगण चढवणं जमत नाही?" व्यापाऱ्याने विचारले.

"हे चकचकीत रोगण देण्यात इराणी कारागीर नावजलेले आहेत. खांबांच्या माथ्यावर जे प्राणी कोरलेले असतात तीही कला त्यांचीच." नोंदणी अधिकाऱ्याने माहिती दिली. "पण आपल्या भारतीय कारागिरांनीही महत्त्वाची कामे केलेली आहेत. उदाहरणार्थ : गिरनारपासून जवळच सुदर्शन तलावावर त्यांनी प्रचंड धरण बांधलेलं आहे."





आणि मग शिल्पकार पुढे म्हणाला, "वरच्या माथ्यासाठीसुद्धा मोठा अखंड दगड लागतो. त्यासाठी तुमच्या भारतीय कारागिरांनी एक नवीनच प्रकार शोधून काढला आहे. मोठे कल्पक लोक. माथ्याची खालची बाजू बहुधा एखाद्या वाडग्यासारखी असते. आणि त्याच्यावर नक्षी कोरली की तुमच्या 'कमळ' नावाच्या सुंदर फुलासारखा त्याला आकार येतो. याच्यापुढचं शेवटचं काम म्हणजे माथ्याच्यावर बसवायचे अजस्र प्राणी. त्या बाबतीत आम्ही आमचं कौशल्य पणाला लावतो."

कुठचे प्राणी? शिल्पकाराच्या शेजारी येऊन बसलेल्या छोट्या मुलीने उत्सुकतेने विचारले.

"सिंह!" तो हसून म्हणाला. "बाळ, तुमच्या देशात किंवा आमच्या देशात काय, सर्वात राजबिंडा रानपशू म्हणजे सिंहच. तसा बैलही खांबाच्या माथ्यावर छान दिसतो, आणि घोडा पण. सर्वांत उत्कृष्ट खांब सारनाथला आहे. त्याच्यावर चार भले दांडगे सिंह पाठीला पाठ लावून बसलेले आहेत. पृथ्वीच्या चारी दिशांकडे ते पाहात असतात."

शिल्पकार पुढे सांगू लागला, "खांब नि त्याचा माथा या दोन्ही गोष्टी तयार झाल्या की मग खांब जमिनीत पक्का पुरणं नि त्याच्यावर माथा बसवणं एवढं काम राहिलं."

"माथा कसा बसवतात?" अधिरक्षकाने विचारले,

खांबावर माथा पक्का बसवण्यासाठी तांब्याचा भला जंगी फिरकीवाला खिळा वापरतात." इराणी पाहुण्याने उत्तर दिले.

"भारतीय कारागिरांना कोरून तयार करायला



सर्वांत कोणता प्राणी जास्त आवडत असेल तर तो बुद्धिवान हत्ती" जोगीबुवा म्हणाले. "धौली गावी मी एक कोरलेला हत्ती पाहिला आहे. तो रानातून बाहेर पडत असलेल्या एखाद्या जिवंत जनावरासारखा वाटतो. शेजारीच एका खडकावर राजाज्ञा कोरलेल्या आहेत, तिकडं लोकांचं लक्ष वेधणं हे त्याचं काम."

"महाराजांचे संदेश तुमच्यापर्यंत कसे येतात? विद्यार्थ्यानें शंका काढली. "आणि या भव्य खांबावर तुम्ही अक्षरं कशी कोरता?"

"महाराजांचे संदेश किंवा राजाज्ञा तलम सुती कापडावर लिहिलेल्या असतात. आणि त्या सगळ्या पाटलीपुत्राहूनच पाठवल्या जातात." नोंदणी अधिकारी म्हणाला.

"आणि मग आम्ही ती अक्षरं दगडावर किंवा तयार खांबावर छिन्नीने कोरतो." शिल्पकाराने सांगितले. "फार धीमेपणाचं, कष्टाचं काम आहे ते. कारण हे लिखाण आणि आम्ही कोरतो तो दगड दोन्ही युगानुयुगं टिकायला हवीत ना? आणि पुष्कळदा असं होतं की कोरणाऱ्या कलावंताला स्वतः एवढी मेहनत घेऊन कोरलेली अक्षरं वाचतासुद्धा येत नाहीत."

"मला माहीत आहे, की तुमचं लिहिणं डावीकडून उजवीकडे असतं. आमच्या देशात आम्ही उजवीकडून डावीकडे लिहीत जातो. तू विद्यार्थी आहेस. ज्ञान मिळवण्यासाठी दूरदूरची पायपीट तू करतोस. तेव्हा तुला या शिलालेखांची भाषा यायला हवी."

"आमच्या या मित्राला ज्या भाषेचा अभ्यास करायचा आहे ती वेदांची भाषा—विद्वानांची भाषा—संस्कृत" व्यापारी म्हणाला.




पण हे शिलालेख आहेत लोकांच्या भाषेत. प्राकृतात. कारण आमच्या परोपकारी महाराजांना वाटतं की एकूण एक प्रजेला हे आदेश कळले पाहिजेत."

"या शिलालेखांची लोकभाषा मलाही कळते" विद्यार्थी म्हणाला. "ब्रह्मी लिपी ही एकच लिपी अशी आहे की ती विद्वानांना आणि लेखनिकांनाही समजते."

"मी असं ऐकलं आहे की वायव्य प्रदेशातल्या काही शिलालेखांमधून दुसरीच एक लिपी वापरतात." नोंदणी अधिकारी म्हणाला. "तिथल्या लोकांची ती लिपी असावी. खरोष्ठी म्हणतात तिला. ती उजवीकडून डावीकडे लिहिण्याची पद्धत आहे."

"तुम्हाला सर्वांना लिहिता वाचता येतं?" छोट्या मुलीने उत्कंठेने विचारले.

"साधारणपणे व्यापारी लोकांना लिहिता येतंच. आणि अधिकाऱ्यांना पण. कारण त्यांना हिशेब नि टिपणं ठेवायची असतात" नोंदणी अधिकाऱ्याने उत्तर दिले. "विद्यार्थी वेद नि धार्मिक ग्रंथ मुळी पाठच करतात. पण दैनंदिन कामधंदा करायचा म्हणजे लेखनाचं ज्ञानही हवंच."





"तुम्ही कशाने लिहिता? मला लिहिता येत असतं तर!" छोटी मुलगी बोलून गेली.

तरुण विद्यार्थी हसला आणि त्याने कापडात गुंडाळलेलं एक पुडके सोडले. आत असलेल्या भूर्जवृक्षाच्या साली आणि ताडाची पाने, तसेच एक टोकदार लेखणी नि कुंचलाही तिला दाखवला. हे सगळे त्याच्याजवळ होते.

"उद्या माझ्यापुढे फार मोठं काम आहे" नोंदणी अधिकारी म्हणाला, "महाराजांनी आम्हाला उत्तम धडा घालून दिला आहे. त्यांनी आम्हाला अशी सक्त ताकीद दिली आहे की प्रजेची सुखदु:खं तुम्ही मला कोणत्याही वेळी, कोणत्याही स्थळी कळवली पाहिजेत. मग मी जेवत असो, झोपलेला असो, की बागेत हिंडत असो."

"महाराजांना आनंद वाटतो तो एकाच गोष्टीत—देशाच्या कल्याणात" जोगीबुवा म्हणाले. हिंस्र पशूंच्या झुंजी आणि राजेलोकांचा शिकारीचा छंद त्यांनी बंद करून टाकला आहे. निष्कारण रक्तपात त्यांना आवडत नाही. मग तो मनुष्यांचा





असो किंवा पशुपक्ष्यांचा असो."

"पशूंच्या झुंजी?" इराणी उद्गारला. "आः! तेवढं तुमच्याकडे नाही म्हणून किती चुकल्या-चुकल्यासारखं होतं! माझ्या लहानपणी तक्षशिलेत मी झुंजी बघितल्या आहेत. आहा! कसल्या लढाया त्या! बैल विरुद्ध बैल, हत्ती विरुद्ध हत्ती! पण सर्वात मला आवडली ती झुंज त्या दोन विचित्र एकशिंगी प्राण्यांत झालेली. लांब फताड्या नाकावर मध्य भागी शिंग मिरवणारे प्राणी!"

"एकशिंगी प्राणी?" छोटी मुलगी ओरडली. "अय्या, मी नाही बाई असला प्राणी पाहिलेला. आणि आता तर काय, झुंजी बंद झालेल्या म्हणजे मला तो विचित्र प्राणी कधीच बघायला मिळणार नाही."

नोंदणी अधिकाऱ्याचा एक अबोल, काळा-सावळा सहायक होता. त्याला आता तोंड फुटले. "एक बाळ, मी पाह्यलाय तो प्राणी-गेंडा! सांगू त्याच्याबद्दल? हत्तींना खूप मागणी असते, वाहतुकीचं साधन म्हणून आणि सैन्यातल्या गजदळात भरती करायला. उत्तरेतल्या अरण्यात हत्ती पकडतात ते काम माझ्याकडे असतं. त्याच अरण्यात हा विद्रूप एकशिंगी गेंडाही राहातो त्याची कातडी इतकी जाड असते की जसं काही चिलखत! हत्तीसारखा हुशार प्राणी, जो वाघालासुद्धा भीत नाही. या गेंड्याला टाळतो."

“मी नाही भिणार गेंड्याला. मला गेंडा बघायला आवडेल” छोटी म्हणाली.

“ही बोलली वनराणी!” व्यापारीबुवा ओठातल्या ओठात पुटपुटले. त्यांची पुटपुट अधिरक्षक नि त्याची बायको यांच्या कानावर गेली. त्यांनी मुलीकडे मायेने पाहिले.

पण त्या पोरीची मुळीच चलबिचल झाली नव्हती.

“मला रानटी प्राणी आवडतात” ती मनमोकळे हसत म्हणाली.

“शिकारी नाहीत, लढाया नाहीत!” कोपऱ्यात बसलेला म्हातारा कुरकुरला. “हे असंच चाललं तर आमच्या सम्राटाबद्दल दुसऱ्या राजांना आदर तरी कसा वाटावा? राजांचं काम म्हणजे लढाया मारणं, प्रदेश जिंकणं! राजांचा खरा खेळ म्हणजे शिकार!”

“आमचा महाराजांना विजय मिळवावासा वाटतो, पण तो कर्तव्यधर्माचा प्रचार करून.” नोंदणी अधिकाऱ्याने ठणकावले. “दूर देशांतल्या राजांना आमचे महाराज संदेश पाठवीत असतात–पश्चिमेतल्या राजाला, लंकेतल्या राजाला–ते सांगत असतात की खरा विजय हा धर्माने मिळत असतो–न्यायधर्माने.”

“गेल्याच वर्षी महाराजांनी आपल्या मुलाला, राजकुमार महिंद्राला सिंहलद्वीपात (लंकेत किंवा सीलोनमधे) पाठवलं होते. लंकेचा राजा नि सर्व लोक या धर्माचे अनुयायी बनले. कर्तव्यधर्माचा हा पहिला विजय होय.”





पाहुणेमंडळी झोपण्यासाठी पांगली. शिल्पकार आपल्या जनावरांचा समाचार घेण्यासाठी आंगणात गेला.

“पाहुण्याकाकांना मी त्यांच्या घोड्याकडे नेऊ का? मग छोट्या बाळाला काही हवंय की काय तेही पाहीन” बिंबीने विचारले. तिच्या आईने हसून होकार दिला आणि बिंबी इराणी पाहुण्यांबरोबर पळाली.

यजमान नि त्यांची मंडळी आपल्या घरकुलाकडे वळली. तिथे मुले आपल्या आजीपाशी कोपऱ्यात झोपत. अधिरक्षकबाई आपल्या नवऱ्याला म्हणते, “तो व्यापारी बिंबीकडे चौकस नजरेने पहात होता. मला वाटतं तिच्याबद्दल काय खरं ते तिला सांगायची वेळ आली आहे आता. बिचारीला किती वाईट वाटेल!”

“केव्हाना केव्हा तिला कळायलाच हवं.” म्हातारी म्हणाली. “वर्षभराने काय किंवा आज रात्री काय! मुली तू इतकी काळजी करू नकोस. बिंबीला धक्का बसला तरीसुद्धा आपलं प्रेम आणि आपण तिची घेत असलेली काळजी पाहून ती त्या धक्क्यातून सावरेल.”

त्या दोघीजणी झोपण्याची तयारी करीत होत्या तेवढ्यात बिंबी आत आली. तिच्या डोळ्यांत अश्रू दाटले होते. “आई! मी मोठ्याकडे गेले ना तेव्हा व्यापारीकाका म्हणत होते—ही यांची मुलगी असणं शक्य नाही.”

“ये बाळ, माझ्याजवळ बस, आणि काय झालं ते मला सगळं सांग!” आई म्हणाली. बिंबी खाली बसली. पण आईने तिला कुशीत घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा ती दूर झाली, मग म्हणाली,



"तो शिल्पकार, तो हत्ती पकडणारा नि मी, तिथं इराण्याचा घोडा बघायला गेलो." बोलता बोलता पुन्हा तिला रडू कोसळले. पण तिने डोळे पुसले. "आम्ही तबेल्यातून बाहेर पडलो तोच व्यापारीबुवाचं बोलणं ऐकलं. तो अधिकारीदादांना सांगत होता, ती पोर यांची मुलगी असणं शक्य नाही. पोरकी पोर असणार रानावनातली. यांनी उचलून घरी आणली, बाळगली, पण ही मंडळी चक्क तिला मुलगी मानतात. नोकर किंवा गुलाम मानीत नाहीत हे केवढं नवल आहे नाही ?"

"हे असलं कधी माझ्या मनात आलं नव्हतं, पण तो बुवा जे सांगत होता ते खरं असणार ! मी तुझ्यासारखी पण दिसत नाही नि बाबांसारखी पण दिसत नाही. —का ?" बिंबीने रोखठोक प्रश्न केला.

तिच्या बाबांनी आत येता येता हे बोलणे ऐकले होते. ते म्हणाले, "बाळ, तू आमच्याकडे कशी आलीस हे सांगायचं म्हणजे मागच्या गोष्टी आठवायला हव्यात." आणि शांत स्वरात पुढे सांगू लागले, खूप खूप वर्षांपूर्वी—आपण या धर्मशाळेत राहायला आलो त्याच्यापूर्वी तुझ्या आईची नि माझी भेट झालेली नव्हती. आमच्या दोघांच्या घरांमध्ये शेकडो कोसांचं अंतर होतं.

"माझे बाबा महाराजांच्या नोकरीत होते. अशोक महाराज त्यावेळी उज्जैनचे राज्यपाल होते. माझी आई, म्हणजे तुझी आजी त्यावेळी सुंदरदीदीची दाई म्हणून काम करी. दीदी ही या श्रीमंत व्यापाऱ्याची मुलगी. राजकुमाराला ती फार आवडायची. पण तो पाटलिपुत्राला आला आणि राजा झाला तेव्हा ते सारं त्याला विसरावं लागलं. माझं लग्न झालं होतं आणि मला माझं घर नि बायको मुलं होती.



"आणि मग एक दिवस मला राजाच्या सैन्यात लढण्यासाठी बोलावणं आलं. युद्धावरून मी सुखरूप परतलो. पण मधल्या काळात एका रोगाच्या साथीत माझी बायको, मुलं सगळी मेली होती. ही भयंकर बातमी माझ्या कानांवर घालायला माझी आई तेवढी जिवंत होती.

"मी वेडापिसा झालो. दूर देशात लढण्यासाठी मला जेव्हा पुन्हा बोलावणं आलं तेव्हा मला त्यातल्या त्यात बरं वाटलं. या वेळचं युद्ध म्हणजे सम्राट अशोकाने जिंकलेलं अखेरचं युद्ध. रानावनांनी भरलेल्या कलिंग देशात ही लढाई झाली.

"लढाई खूप लांबली. कडाक्याचं युद्ध झालं. दोन्ही बाजूच्या सैनिकांनी खूप लुटालूट केली. घरं जाळली. कुटुंबांच्या कत्तली केल्या. शेतकऱ्यांचं अमाप नुकसान झालं आणि रानावनातल्या लोकांचं पण. त्याच काळात तुझी आई घरादाराला आणि घरातल्या माणसांना मुकली. तुझंही तसंच झालं असणार. अवघा आठ महिन्यांचा जीव होता तुझा."

एवढे सांगून झाले नि तिच्या आईने पुढे म्हटले, "माझंही घर त्यावेळी निराळं होतं. मलाही मुलं होती. माझे यजमान शेतकरी होते. माझी तीन मुलं—त्यांतलं एक तर तान्हं बाळ. आमची शेतं नि झोपड्या रानाला लागून होत्या. काही काळ आम्हाला काही त्रास पोचला नाही. पण मग एक दिवस सैनिकांचं एक टोळकं आलं. त्यांनी माझ्या यजमानांना आणि तिन्ही मुलांना ठार मारलं. आमच्या झोपडीची राखरांगोळी केली. मी त्यांच्या हातांत पडण्यापूर्वीच त्यांना कुठूनतरी बोलावणं आलं आणि ते सगळे घाईघाईने निघून गेले.

"मी एकटीच दुःखाने चूर होऊन पडले होते. इतक्यात एक छोटी मुलगी रांगत, रडत माझ्याजवळ आली. माझ्या कुशीत शिरून बाळी झोपली सुद्धा माझ्या मांडीवर. मी त्या छोटुकलीला दूर सारते तर आणखीनच मला ती बिलगली. मला सोडीचना !

"दिवसांमागून दिवस गेले आणि ही चिमुरडी काळ्या केसांची मुलगी माझी लाडकी बनली. आम्ही दोघी रानातली फळं नि कंदमुळं खाऊन जगत होतो. एक दिवस काहीतरी खायला मिळतं का म्हणून शोधीत मी रानाच्या शिवेवर गेले होते



तर एका धोंड्याला अडखळून पडले. माझी शुद्ध गेली असणार. शुद्धीवर आल्यावर पाहते तर एक मनुष्य माझ्या अंगावर ओणवून तोंडावर पाणी मारीत होता.

" 'भिऊ नकोस' मी जेव्हा घाबरून त्याच्याकडे पाहिलं तेव्हा तो म्हणाला. 'कुणाही बाईला किंवा मुलाला मी त्रास देत नसतो. मूल रडण्याचा आवाज ऐकला म्हणून मी इथे आलो.' आणि आता खुदूखुदू हसत असलेल्या त्या छबडीकडे पाहून त्याने आश्चर्याने विचारलं, 'तुमची मुलगी!' " 'शिपायांनी माझी मुलं मारली तेव्हा ही येऊन मला चिकटली' मी म्हणाले. पण हिला वाढवणं मला शक्य नाही. तुम्हीच तिला घ्या, तिचा सांभाळ करा.' "

आता बाबा पुढची हकीकत सांगू लागले—

"मी हिला म्हणालो, 'मी एकटाच हिला सांभाळू शकणार नाही. आपण माझ्या-बरोबर याल तर तुमची दोघींचीही मी काही दिवस काळजी घेईन. अंगात शक्ती आली की परत जाऊ शकाल तुम्ही.'

"आणि आम्ही बरोबर राहू लागलो. आणि युद्ध संपलं तेव्हा मी तुम्हाला दोघींना माझ्या आईकडे घेऊन गेलो. बाळ, तिला जेव्हा तुझ्यावर आलेल्या संकटांची हकीकत कळली तेव्हा तिने तुला आनंदाने जवळ केल. तुझ्या आईला तिनं स्वतःची मुलगी मानलं आणि तुला मानलं आपली नात.

"यानंतर लौकरच सम्राटांनी भगवान बुद्धाच्या धर्माची दीक्षा घेतली. आता त्यांना आपल्या दिग्विजयापायी लोकांची जी हत्या नि छळ झाला होता त्याबद्दल



पश्चात्ताप झाला. आणि त्यांनी यापुढे युद्धच करायचं नाही विसा निर्धार केला. त्यांच्या एका शिलालेखात म्हटलं आहे: 'त्यावेळी जी माणसं मारली गेली किंवा गुलाम केली गेली त्याच्या एक शतांश, फार काय एक सहस्रांश माणसांवर जरी आज तसा प्रसंग ओढवला तरी महाराजांना अत्यंत दुःख होईल.' यापुढे धर्माने राज्य करायचं असं त्यांनी ठरवलं आणि त्यांच्या सबंध साम्राज्यात एका नव्या जीवनाचा संचार झाला. मी जेव्हा ऐकलं की एका धर्मशाळेवर देखरेख करणारा कुटुंबवत्सल माणूस हवा म्हणून सरकारी अधिकारी शोधात आहेत तेव्हा मी त्या जागेसाठी अर्ज केला आणि तो मंजूर झाला. इथे आम्ही आमच्या नव्या आयुष्याला सुरवात केली. तुझी आजी, आई नि मी आणि लौकरच आपल्या कुटुंबात दोन नव्या जिवांची भर पडली. आधी एक छोटा भाऊ आणि मग हा तान्हा मुलगा."

बिंबीने ही लांबलचक कहाणी मुकाट्याने ऐकून घेतली. ती संपल्यावर गंभीर चेहऱ्याने ती म्हणाली, "म्हणजे तो बुवा म्हणाला ते खरं तर! मी तुमची मुलगी नाही आणि माझे खरे आईबाप कोण हे मला ठाऊक नाही!"

हे ऐकून आजी म्हणाली, "नाही ठाऊक? आईबाप आपल्या मुलांचं पालनपोषण करतात; तुझ्या नव्या आईने जर तुला खाऊ पिऊ घातलं नसतं तर तू रानातच मेली असतीस. इतकंच काय, माझ्या मुलाने जर तुम्हाला आसरा द्यायचा आणि संभाळायचा पत्कर घेतला नसता तर तुमच्यापैकी कुणीही फार दिवस जगलं नसतं. छोटा अनिकेत जागा झाला की तुला हाक मारतो. ही माणसं तुझे आईबाप नि भाऊ नाहीत तर कोण आहेत?"

"आहेत, आहेत." बिंबी म्हणाली. तिच्या चेहऱ्यावर हसू उमटले आणि ती आजीच्या अंगाला बिलगली. मग उठून जांभया देत म्हणाली, "मला उद्या खूप लौकर उठव ग! म्हणजे बाबांना नि आईला मी कामात मदत करीन. कारण इतके पाहुणे आलेले, उद्या खूप काम असणार, शिवाय त्या हत्ती पकडणाऱ्या माणसाने मला एकशिंगी प्राण्याबद्दल आणखी सांगण्याचं वचन दिलं आहे."

## कावेरीपट्टणमची व्यापारपेठ

कावेरीपट्टणम ही चोल राजांची वैभवशाली राजधानी. तिथे आज केवढी खळबळ माजली होती. एक टोलेजंगी जहाज नुकतेच बंदरांत आले होते. आणि त्याच्यावरचा उंची माल धक्क्यावर उतरूनही झाला होता. आता लौकरच या देशात तयार झालेला माल गलबतावर लादला जाणार होता. पुहारमधून लोकांचा लोंढा बाहेर पडत होता. पुहार पुराणे तटबंदीचे शहर, तिथे राजाचा राजवाडा होता. श्रीमंतांचे टुमदार वाडे होते. मधल्या बाजारपेठेतून लोकांचा जमाव लोटला होता समुद्रकिनाऱ्याकडे—तिथल्या बंदरगावाकडे. इथे मालगुदामांच्या, धक्क्यांच्या नि जकातनाक्यांच्या गर्दीत होता परदेशी मोहल्ला. देशोदेशींचे खलाशी नि व्यापारी तिथे असत. नदीच्या तोंडाशी बंदर होते—जहाजांनी, पडावांनी नि होड्यांनी गजबजलेले. आणि दूर अंतरावर उंच डोके काढीत होता दीपगृहाचा मनोरा!

मध्यान्हीची वेळ. सात छोटे मित्र बंदरात भेटले. विटांच्या पक्क्या बांधलेल्या फलाटावर उभे राहून खालच्या किनाऱ्यावरून नजर टाकीत तो खाली चाललेली




गडबड पाहात होते. त्यांपैकी सत्यन, परनर, आणि सादुवान हे श्रीमंत व्यापाऱ्यांचे मुलगे होते. पेकन हा एका जकात अधिकाऱ्याचा मुलगा होता. अप्पारचे वडील विद्यामंदिरात आचार्य होते. राहुल हा जहाजाच्या एका कप्तानाचा मुलगा होता आणि वेल्लुवरचे आईवडील कवी होते.

इतक्यात कुंभाराचा मुलगा इलम येताना दिसला. खांद्याला अडकवलेल्या टोपल्यांच्या ओझ्याने त्याचे खांदे वाकले होते. "इलम–, इलम–!" वेल्लुवरने हाक मारली. "ती मडकी खाली ठेव आणि आमच्याबरोबर मिठाई खायला ये."

खांद्यावरचा बांबू इलमने खाली उतरवला तेव्हा त्याला हायसे वाटले. तो खाली बसला. "आज सकाळी मी दहा मडकी विकली. मग बाजारात गेलो—आईसाठी तांदूळ, मीठ, सुकी मासळी नि मध आणायला. इतकं करूनही काही कवड्या शिल्लक टाकू शकलो मी!" त्याने अभिमानाने सांगितले.

"गाडगी नि मडकी!" वेल्लुवर बडबडला. "चकचकीत काळी नि लाल, किंवा मळकट काळी, भुरकट; नक्षीदार झाकणाची; मोठ्या तोंडाची किंवा चोचीसारखी. जिवंत माणसांना पोसण्यासाठी अन्न शिजवायला आणि मेलेल्यांची राख भरायलाही पुन्हा गाडगी मडकीच!"



"तू गप्प बसशील का ?" सादुवान म्हणाला. त्याने एका पानावर थोडी मिठाई वाढून ती इलमला दिली. "अशा सणावारी मसणाची गाणी, स्मशानगीतं का गातोस ? आणि काही असलं तरी ती मडकी इलमचे बाबा बनवीत नाहीत."

"स्मशानातली मडकी दुसराच कुंभार बनवतो" इलम म्हणाला. "काय छान मिठाई आहे ! बाजारातल्या त्या दुकानातनं आणली ?"

"नाही" सदुवान म्हणाला. "माझ्या आईने बाबांकरता मुद्दाम घरी केली. कालच बाबा लांबच्या सफरीवरून परत आले. ते उत्तरेतून माल आणायला गेले होते. तिथून माल आणायचा नि यवनांच्या (ग्रीक-रोमन) जहाजांना विकायचा."

"तुझे बाबा जमिनीवरून गेले की समुद्रावरून ?" राहुलने विचारले.

"या खेपेस ते एका किनारी जहाजातून गेले होते." सादुवानने सांगितले.

"अरण्याने भरलेल्या त्या काळ्या डोंगरदऱ्यांतून लोक खरंच जात असतील ?" इलमने विचारले.

"दक्षिणापथ आणि उत्तरपथ यांच्यात सतत अशी ये-जा नेहमी चालूच असते" अप्पारने उत्तर दिले.

मग सादुवानकडे वळून त्याने विचारले. "तुझ्या बाबांनीही पूर्वी भूमिप्रवास केलेला आहे ना ?"

"हो. परत येताना घोडे आणावे लागले तेव्हा केला होता." सादुवान म्हणाला. "आपल्या देशातली सुती कापडं, मसाले, मोती, शंख नि मोत्यांचे शिंपले ते उत्तरेला नेतात आणि उत्तरेतल्या निरनिराळ्या भागांतून घोडे, रत्न, औषध नि अत्तर घेऊन येतात. महाराजांना नि सैन्याला घोडे नेहमीच लागतात. आणि रत्न, अत्तर नि औषध आपल्या-कडच्या श्रीमंतांना लागतात. कधी कधी ती पुन्हा यवन व्यापाऱ्यांनाही विकली जातात."

"मालाची नि विचारांची ही देवाणघेवाण शतकानुशतकं चालू आहे." अप्पार म्हणाला, "मगधदेशच्या मौर्यांना दक्षिणेतल्या मोत्यांची माहिती होती. महान् मौर्य सम्राट अशोक त्याने तर लंकेला धर्मगुरू पाठवले होते. शिवाय तिथल्या माणसांसाठी नि प्राण्यांसाठी औषधी वनस्पती धाडल्या होत्या."

किनाऱ्यावर एक उंचाडा मुलगा उभा होता. त्याच्याकडे पाहून वेल्लुवरने एकदम





जोरजोराने खुणा करणे सुरू केले. "पोपट पकडणारा कारी आज फार उदास दिसतो." तो म्हणाला, "मी त्याला घेऊन येतो. सादुवान, माझ्या वाटची मिठाई त्याला दे हं !"

कारी काळाकाळा, उंच नि काटकोळा मुलगा होता. कपडे जेमतेमच. पण चेहऱ्यावर नेहमी हसू असायचे. आणि खांद्यावर एक गुलाबी कंठाचा हिरवा पोपट. हातांत वेताचे पिंजरे. त्यातही छोटे पोपट असायचे. हे पक्षी तो विकायला नेत असे. वेल्लुवर जवळ आला तशी तो बाजूला वळला. पण वेल्लुवरने त्याचा हात धरून त्याला ओढीतच नेले. तो त्याच्या कानाशी सारखा वटवट करीत होता.

वेल्लुवरने आपल्या मित्राला जवळ बसवले. कारी सहजासहजी बोलणार नाही हे त्याला माहीत होते. म्हणून तो पुन्हा चतुरपणे मूळ विषयाकडे वळला. "पेकन, तुझे बाबा जो माल आणतात त्याबद्दल आणि सरकारी जकात नाक्यावर त्यांना काय काय करावं लागतं त्याबद्दल सांग ना थोडं !"

आणि पेकनने सांगितले. "बंदरगावच्या रुंद रस्त्यावर, व्यापाऱ्यांच्या मालगुदामाबाहेर मालाचे गठ्ठे पडलेले असतात. त्यांची किंमत करून राजाचा शिक्का त्यांच्यावर मारायचा असतो—हा शिक्का म्हणजे शेपूट उंचावलेला भयंकर वाघ ! मग मालावरची आवक गोळा केली जाते आणि नंतरच गलबतांवर चढवला जातो. जहाजातून उतरलेल्या मालाची पण किंमत करून शिक्का मारतात आणि मगच तो व्यापाऱ्यांच्या स्वाधीन करतात."



"यवनांच्या जहाजांना माल पुरवण्यासाठी सादुवानच्या बाबांसारख्या आमच्या मातब्बर व्यापाऱ्यांना काफले घेऊन किंवा जहाज घेऊन उत्तरेला कशासाठी जायला हवं तेच मला समजत नाही. यवन स्वतः येतात की माल न्यायला!" कुंभाराचा मुलगा म्हणाला.

"बरोबर विचारलंस" सादुवान म्हणाला, "माझ्या बाबांनी उपसागर ओलांडून पूर्वेकडेही प्रवास केला आहे—गंगेच्या नि इरावतीच्या मुखापर्यंत. महासागर ओलांडून पूर्वेकडच्या बेटांपर्यंतही ते गेलेले आहेत. नुसता आपल्यापुरता माल आणण्यासाठी नाही, तर पश्चिमेच्या यवनांना तो विकण्यासाठी. त्यांना काय काय लागतं—मिरी, मोती—"

"आणि पोपट!" वेल्लुवर मध्येच म्हणाला. त्याला कुठून तरी पोपटवाल्या मुलाला बोलते करायचे होते. पण कारीच्या कपाळावर नुसती आठी चढली.

"हो ना—पोपट, मोर, माकडंसुद्धा. मऊ पातळ मलमल, हस्तिदंत, आणि कासवाची पाठ. तसंच वैदूर्य मणी, श्रीमंत यवनांना हा मौल्यवान खडा, शिक्के, रत्न,



मुद्रा वगैरे बनवण्यासाठी हवा असतो. त्याची किंमत ते सोन्यात देतात."

"इथे विकण्यासाठी तेसुद्धा तऱ्हतऱ्हेच्या जिनसा आणतात." पेकन म्हणाला, "थंडगार द्राक्षारसाने भरलेल्या दोन कानांच्या बद बरण्या, चिकणमातीची भांडी. काचेच्या वस्तू आणि विशेष म्हणजे कोरीव काम केलेले दिवे—कंदील."

"आणतात खरे" सादुवान म्हणाला. "पण आपल्याला लागणाऱ्या त्यांच्या वस्तूंपेक्षा त्यांना आपल्या वस्तू जास्ती लागतात. आणि म्हणून आपले व्यापारी खूप लांब लांब दौरे काढतात. आपल्या राजासाठी, शहरासाठी नि स्वतःसाठी संपत्ती मिळवून आणतात. देशाच्या आतल्या भागात ज्या व्यापारी संस्था आहेत त्यांच्याकडून, तसेच मसाल्याचे देश म्हणून प्रसिद्ध असलेल्या पूर्वेकडच्या देशांमधून ते मिरी मिळवतात. वाघाची नि चित्त्याची कातडी सैनिकांना चिलखतासाठी लागतात. आपल्याकडेच केवळ नाही, यवनांकडेही आपण त्यांची निर्यात करतो. आपल्याकडे जी दाट अरण्यं आहेत, त्यांतल्या शिकाऱ्यांकडून आपले व्यापारी कच्ची कातडी नि हस्तिदंत विकत घेतात. आपल्या समुद्रकिनाऱ्यावरून तसंच पूर्वेकडच्या बेटांमधून, (मलाया द्वीपसमूह) ते कासवाच्या पाठी खरेदी करतात."

आता सत्तनही संवादात भाग घेऊ लागला. तो म्हणाला, "मला वाटतं, आपण हा जो माल आणून देतो तो आणि आपली तलम कापडं कित्ती दिली तरी यवनांना पुरी पडणार नाहीत! ते भाव चांगला देतात आणि त्यांच्या सोन्याने आपल्या तिजोऱ्या भरतात. आणि अर्थात भात, मासळी, तिळाचं तेल, केळी नि फणस यांची नेहमीच गरज लागते. कारण खलाशांचं आणि शहरांतल्या नि खेड्यांतल्याही कितीतरी लोकांचं तेच खाणं असतं."

इलम मध्येच काळजीच्या सुरात म्हणाला, "खलाशी जर एवढं सगळं घेऊन जात असतील तर आपलं गरिबांचं काय? आम्हाला नको का भात नि मासळी?" कारीने भुवया आक्रसल्या आणि मान डोलवून रुकार दिला.

"तू चिंता करू नकोस" पेकन म्हणाला. "प्रत्येकाला भरपूर आहे. कावेरीच्या खोऱ्याइतकी दुसरी कोणतीही भाताची भूमी संपन्न नाही. आणि आपल्या किनाऱ्यालगतचा समुद्र माशांनी भरलेला आहे."

मध्येच कारी एकदम उखडला. "पण हे यवन त्यांच्या देशातच का राहात नाहीत? येतातच कशाला इकडे?"

"का? काय बिघडलं? तुझा पोपट ना रे हा? काय झालंय त्याला? आम्हाला सांग तरी!" अप्पारने हळुवारपणे विचारले.

कारीच्या मुखातून भडाभडा शब्द निघाले, "तुमच्या यवन मित्रानेच माझा पोपट पळवला."

मुलं एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागली. "कुठच्या यवनाने?" इलमने आश्चर्याने विचारले. "पळवला म्हणजे? हिसकावला तुझ्या हातातून?"

कारीचे डोळे रागाने लाल झाले होते. "माझ्या बाबांनी माझा लाडका पोपट पैशाच्या लोभाने विकला!" हे सांगताना त्याचा गळा दाटून आला.

"सुरवातीपासून सांग पाहू सगळं नीट." अप्पारने त्याला खंबीरपणे म्हटले.

शेवटी आले सगळे बाहेर. "काल माझा सुखाचा शेवटचा दिवस संपला. बाबा नुकतेच वाघाची शिकार करून आले होते. आणि ते सुखरूप परतले म्हणून आई कावळ्यांना खायला टाकीत होती. याच हंगामात पोपट अंडी घालतात. मी पोपटाची आठ पिलं वाढवली होती. आणि ती शहरात नेऊन विकणार होतो. संध्याकाळी मीठवाला आपली गाडी घेऊन आमच्या गावात आला. आसपासच्या डोंगरी खेड्यातून मीठ नि सुके मासे विकून तो आता शहराकडे निघाला होता. आता त्याचं ओझं हलकं झालेलं होतं—म्हणजे रानातल्या लोकांकडनं त्याने मधाची मोहळं, फणस, गोड कंद नि कडू भोपळे असे काही जिन्नस घेतले होते. आमच्या गावी तो थांबला तेव्हा बाबांना त्याने सांगितलंन 'एक यवन जहाज बंदराकडे येतं आहे.' आणि म्हणतो कसा, 'तुम्ही मोठे शहर पाहिलेलं नाही ना कधी? मग चला माझ्याबरोबर. आणि तुमची वाघाची कातडीही घ्या आत्ताच बरोबर. केव्हातरी एखादा व्यापारी येईल नि घेईल म्हणून कशाला थांबता!' निघालो आम्ही सगळेच." एवढे बोलून होईतो कारीचा आवाज फुटला. थोडा थांबून तो पुढे म्हणाला, "आम्ही शहरात पोचलो. तिथल्या जकात नाक्यावर गेलो आणि वाघाची कातडी विकण्याची





व्यवस्था केली. बंदरधक्क्यावर खलाशी होते. त्यांत काही यवनही होते. माझ्या आईने बनवलेल्या पिंजऱ्यांतले पोपट त्यांच्या मनात भरले. आणि मग एक यवन व्यापारी आला. त्याने अंगात एक जाडजूड आंगरखा घातला होता, आणि कंबरेभोवती कापड गुंडाळलं होतं. चिक्कार पैसेवाला असावा."

कारी पुन्हा थांबला. तेव्हा परनरने त्याची समजूत घातली. "यवन वापरतातच चिक्कार कपडे. कदाचित त्यांचा देश फार थंड असेल. काही असलं तरी आपला त्यात फायदा आहे. कारण त्यांच्याकडे आपलं कापड जास्ती खपतं."

कारीने जबर आवंढा गिळला. तो म्हणाला, "माझा पोपट माझ्या खांद्यावर बसलेला होता. वटवट करून त्यांना सलामी देत होता. एकदम तो दुष्ट यवन जवळ आला. म्हणाला, 'मी हा पोपट विकत घेतो.' बाबांनी त्याला सांगितलं, 'तो विक्रीचा नाही. त्याला पिंजराही नाही.' तशी तो म्हणतो, 'काही हरकत नाही. कोणत्याही पिंजऱ्यात घाला त्याला. पण मला हाच पोपट हवा. माझ्या मुलखात एक आजारी मुलगा आहे. बिछान्याला खिळलेला. त्याच्यासाठी हवा.' 'नाही, नाही,' मी ओरडलो. आणि खांद्यावर डुगडुगणाऱ्या माझ्या मोतीला घेऊन तिथनं पळालो.

“आणि मग त्या दुष्टाने एक चांदीचं नाणं बाहेर काढलं. मी असं नाणं कधी पाहिलं नव्हतं. माझे बाबा—हत्तीभूक लागली होती जशी काही यांना! त्यांनी एका पोपटाला त्याच्या पिंजऱ्यातून बाहेर काढलं, माझ्या मोतीला पकडून पिंजऱ्यात घातला, आणि व्यापारी गेलासुद्धा घेऊन तो पिंजरा! मी त्याच्या मागे आरडा-ओरड करीत धावलो, पण माझ्या बाबांनी मला अडवलं. ते म्हणाले, ‘तुला मिठाई घेऊन देतो.’ पण मी पळालो त्यांच्यापासनं दूर. आणि तेव्हापासून मी किनाऱ्यावर हिंडतो आहे नुसता—माझ्या लाडक्याची आठवण काढीत.”

पेकन समजावणीच्या सुरात म्हणाला, “यवन त्याला नीट वागवील. आपले कारागीर चांदीच्या तारेचे सुंदर पिंजरे बनवतात. त्यांना हस्तिदंत नि कासवाच्या पाठीचे तुकडे जडवलेले असतात. श्रीमंत यवन आपल्या आवडत्या पक्ष्यांसाठी ते विकत घेतात.”


“माझ्या मोतीला चांदीचा पिंजरा नको आहे. त्याला माझा खांदाच हवा असतो!” कारी म्हणाला.

“केव्हा झालं रे हे सगळं?” सत्तनने विचारले.

“पहाटे. तो मीठवाला गाडी घेऊन आला नसता तर यवनाशी आमची गाठ पडली







नसती. आणि मग बाबांना हत्तीभूक लागली नसती. ते चांदीचं नाणं घेऊन काय चाटायचंय?”

“तू आज जेवला आहेस का सकाळी?” वेल्लुवरने हळूच प्रश्न केला.

“माझा घसा गुदमरलाय. मी खाणार कसा? माझा मोती....त्याला काय मिळालं असेल खायला?”

“खलाशी लोकांकडे नेहमी बियादाणे असतात पोपटांना घालायला!” सादुवान प्रेमळपणे म्हणाला, “तुझ्या मोतीला छान खायला मिळालं असेल. तू ही मिठाई घे, कारी.”

“धन्यवाद, सादुवान. पण माझ्या घशाखाली काही उतरायचं नाही आता. मी किनाऱ्यावर जाऊन बसतो, समुद्राकडे पाहात. मोती ज्या दिशेला जाणार तिकडे पाहात. आता रोज सकाळी उठेन तेव्हा जवळ मोती नसणार ही कल्पनाच मला सहन होत नाही. एखाद्या जहाजवाल्याला जहाजावर काम करायला धट्टाकट्टा पोरगा हवा असेल, तर मी जाईन. यापुढे झाडावर चढण्याऐवजी मी डोलकाठ्यांवर चढेन. बाबा बसू देत एकटेच झाडावर पोपट पकडीत!”

“मी तुला एकटा जाऊ देणार नाही. तुला घट्ट धरून ठेवीन.” वेल्लुवर प्रेमभराने म्हणाला.

**व्यापाराचा सागर : जहाजे व जलमार्ग**

राहुल हा दर्यासारंगाचा मुलगा. त्याच्याकडे वळून परनरने विचारले, “मला सांग. हे पश्चिमेतले परदेशी लोक नामीळनाडमधे कशासाठी येतात?”

"तीन राज्यांच्या तीन राजांशी यवनांचा व्यापार चालतो." राहुल सांगू लागला. चेरा देशातलं मुझीरी बंदर त्यांच्या सरळ वाटेवरच आहे. तिथे यवन जातात ते मिरी विकत घ्यायला. त्यांची निम्म्यापेक्षा जास्त आयात मिऱ्यांचीच असते. आणि मग रत्नांची राणी जी मुक्ता—मोती—ती मिळवण्यासाठी ते कोरकाई (कोलकाई) ला जातात. पांड्यांच्या राज्यातल्या शंख नि मोत्यांच्या व्यापाराची ती मुख्य पेठ आहे."

आता सादुवान सांगायला लागला—

"तामीळनाडूच्या सुंदर सुंदर वस्तूंची यवनांना हत्तीभूक लागलेली असते. आणि आपला चोल किनारा म्हणजे पूर्वपश्चिम देशांच्या वाटेवर नेमका मध्यभागी आहे. त्यामुळे त्यांना या वस्तूंचा पुरवठा इथूनच होणं सोयीस्कर असतं. आपली मुख्य निर्मिती कोणती? तलम सुती कापड. मलमल. कारण कपाशीचं झाड—यवन त्याला लोकरीचं झाड म्हणतात—त्यांच्या देशात कुणाला माहीतच नाही. पण हा व्यापार इतका फायदेशीर असतो, की आपले व्यापारी चोल राज्यातल्या सर्व प्रकारच्या वस्तू तर यवनांना विकतातच; पण शिवाय पूर्वेकडच्या बेटांतून मिरी, मसाले नि कासवपाठी, तसंच उत्तरेकडून रत्न नि हस्तिदंत आणून ती पण यवनांना विकतात"

"कावेरीपट्टणमला कितीतरी यवन नि दुसरे परदेशी राहात असतात." पेकन म्हणाला, "आणि शिवाय माझे बाबा सांगतात, की खूप खूप उत्तरेला पौदौकेला म्हणे, यवन व्यापाऱ्यांची स्वतःची वस्ती आहे. तिथे यवनांची घरं आहेत, बंदर, धक्के नि गोद्या आहेत. आणि वर्षातून कितीदा तरी त्यांची जहाजं येत असतात. कारण ते बंदर निवांत आहे."

"आपण भात खातो तसे हे यवन राक्षस मिरी खातात काय? कारीने एकदम खवचटपणे विचारले.

"त्यांचं अन्न बेचव, मिळमिळीत असणार." परनर म्हणाला. एरवी त्याच्यावर मिरपूड घालून चव आणायची सुरसुरी त्यांना कशाला लागेल?"

"गरीब लोक जो डाळभात खातात त्याच्यावर थोडी मिरपूड टाकली की चव येते" इलमने पुन्हा काळजी व्यक्त केली. "हे परदेशीच जर एवढी मिरी न्यायला लागले तर आम्ही काय खायचं?"





"भरपूर आहे सगळ्यांना" सत्तन म्हणाला. "मिऱ्याच्या वेली तामीळदेशात खूप आहेत. यवनांना जी मिरी हवी असतात ती पांढरी. आपल्या कामगार कुटुंबांना त्यांची फारशी गरज नसते."

कारीने हेटाळणीच्या सुरात म्हटले, "म्हणजे हे यवन स्वतः काहीच करीत नाहीत तर!"

"यवन लोक फार कुशल कारागीर आहेत" पेकन म्हणाला.

"राजाच्या राजधानीसाठी त्यांनी सुंदर सुंदर दिवे बनवून दिले. शिवाय पुहारला जी राजाची बाग आहे ना तिथल्या राजमहालाची शोभा वाढवणाऱ्या सुतारांपैकी कितीतरी सुतार यवन आहेत."

"जहाजं पण चांगली बांधतात ते." राहुल म्हणाला. "पुष्कळदा गलबतांचा तांडाच्यातांडा पौदौकेच्या दिशेने जाताना दिसतो."

"आपली जहाजं केवढी मोठी असतात रे? किती लोक बसू शकतात एका जहाजात?" परनारने विचारले.

"मोठी जहाजं लांबच्या प्रवासासाठी बांधलेली असतात. तिच्यात खलाशी आणि उतारू मिळून दोनशे किंवा जास्तही माणसं बसू शकतात." राहुल म्हणाला, "त्याशिवाय पाचशे गाड्या भरून सामान त्यात राहतं. किंवा कधी कधी इमारती लाकडांच्या राशीच्या राशी असतात. आणि अर्थात अन्नाचा नि पाण्याचा साठा असतोच. किनारी नौका मात्र सागरी जहाजांपेक्षा हलक्या असतात. मोठ्या जहाजांवर या टोकापासून त्या टोकापर्यंत खोल्या बांधलेल्या असतात. याशिवाय काही चिंचोळ्या नौकांना हत्ती, रेडा, पोपट किंवा मोराच्या डोक्याचा आकार दिलेला असतो. जहाजांना उंच डोलकाठ्या असतात. त्यांच्यावरची भली मोठी शिडं वारा भरून घेतात. पण वादळापुढे ती कधीकधी निकामी ठरतात. मात्र वादळी वाऱ्यापेक्षाही वाईट काही असेल तर ते म्हणजे वारा पडणं. वारा अजिबात पडला की जहाजाची हालचाल थांबते." पेकन म्हणाला, "राजाचे सागरी आधीक्षक असतात. ते नादुरुस्त जहाजांना मदत व्हावी म्हणून उत्तम व्यवस्था करतात. पण महासागरावर एकट्या पडलेल्या जहाजाला कोणीच काही मदत देऊ शकत नाही. त्याचं शीड जर वाऱ्याने नि लाटांनी फाटलंबिटलं असेल, डोलकाठीचे तुकडे झाले असतील, तर कोण काय करणार? आणि इतकं असून अशा दूरदूरच्या सफरी गलबतसारखी करतातच आहेत. आपले चोल, तसंच अरब, नि यवन खलाशी पुष्कळदा असे प्रवास यशस्वीपणे तडीला नेतातही."

"जिथे मार्ग नाही, दिशा सापडत नाही, असे हे महासागर आपले खलाशी ओलांडतात तरी कसे रे?" सत्तन म्हणाला.

"समुद्रावरून वाहणाऱ्या वाऱ्याची काही गुपितं असतात." राहुलने सांगितले "आणि त्यातली काही आपल्या खलाशांनी माहीत करून घेतली आहेत. काही मोसमी. वारे असतात. एका ऋतूत ते एका ठराविक दिशेने वाहतात. दुसऱ्या ऋतूत त्याच्याबरोबर उलट दिशेने समुद्र ओलांडताना खलाशी या वाऱ्यांचा उपयोग करून घेतात."

"सादुवानचे बाबा असल्या सफरीवर जातात तेव्हा त्यांना जी संकटे नि त्रास भोगावा लागत असेल त्याच्या कल्पनेने माझ्या अंगावर काटा उभा राहतो!" शहरी मुलगा इलम म्हणाला,

"अरे बाबा, सगळं आयुष्यच तसं असतं." सादुवानने उत्तर दिले. "खेड्यातल्या गुराख्यांचं तरी काय? त्यांच्या गुरांना कमी धोका असतो का? चोर, लुटारू, वाघ, चित्ते यांच्याशी गुराख्याला सामना द्यावा लागतो. कधी कधी त्यांचं रक्षण करताना मरणही ओढवतं. प्रत्येक खेड्यात बेरीकल (वीराचा दगड) असतो, माहीत आहे? त्याला बायका फुलंबिलं वाहतात, आपले पुरुष सुखरूप परत यावे म्हणून नवस करतात. मोती शोधणारा पाणबुड्या तर प्रत्येक दिवशी आपला जीव धोक्यात घालीत असतो! कारीच्या बाबांचं तरी काय?" ते वाघाच्या नि हत्तीच्या शिकारीला



जातात ते जीव मुठीत धरूनच ना? कारीचंच बघ की! तो झाडावर चढून ढोलीत हात घालतो, तेव्हाच पोपटाऐवजी एखादा नाग फणा काढील अशी भीती असतेच ना?" त्याने मुद्दाम कारीकडे पाहिले, त्याच्या मनातले काढून घेता येईल या आशेने. पण तो आपला गप्प नि गंभीर!

"शहराची भरभराट होते आहे आणि यवनांचं सोनं महाराजांच्या तिजोरीत पडतं आहे" सत्तन म्हणाला. इतरांनी माना डोलवून संमती दिली.

पण कारीने कर्कश आवाजात विचारले, "आणि महाराज त्या सोन्याचं काय करतात? आपल्याला त्यापासून काय फायदा होतो?"

यावर पुष्कळ जणांनी वेगवेगळ्या आवाजात एकदम उत्तर दिले. "महाराजाचं पहिलं कर्तव्य आपल्या राज्याचं रक्षण करणं. दुसऱ्या राजांना लोभ सुटतो, डोंगरी टोळ्या नि गुरं पळवणारे लुटारू हल्ला करतात, या सर्वांपासून राजा राज्याला वाचवतो. यासाठी राजाला बलाढ्य सैन्य ठेवावं लागतं." "राजा हा कलांचा महान् आश्रयदाता असतो. फळांनी भरलेल्या झाडाकडे पोपटांनी भरारी मारावी तसे नर्तक, गायक आणि कवी राजाकडे धाव घेतात." "उद्यानांतून नि विद्यामंदिरांतून साधूसंन्यासी नि विद्वान् यांच्यासाठी राजा निवाऱ्याची ठिकाणं तयार करतो." "झालंच तर उत्सव. समारंभ, कुस्त्या नि मुष्टियुद्धं होतात ती सर्वांना बघायला मिळतातच!"

"नांगरवाल्यांचं काय? धनगरांचं नि शिकाऱ्या-पारध्यांचं काय?" कारी गुरगुरला-

"अन्नाचं उत्पादन करणाराची चांगला राजा कधी आबाळ करील हे शक्यच नाही." सत्तन म्हणाला. "तो शेतीसाठी तलाव बांधतो, असतील त्यांची निगा राखतो, रान तोडून शेतीसाठी जमीन मोकळी होते आहे की नाही, औत औजारे शेतकऱ्यांना मिळताहेत की नाही हे सगळं पाहतो."

'सभा' संपली वेल्लुवर उठला. कारीच्या गळ्यात हात टाकून म्हणाला, "कारीला घेऊन मला माझ्या आईकडे गेलं पाहिजे." मग कारीकडे वळून त्याने आग्रह करीत म्हटले, "आम्ही जे रोप लावलंय ते तू पहावंस आणि त्या रोपट्याकडे जे पंख्या-सारख्या शेपटीचे पक्षी येत असतात त्यांच्याबद्दल आम्हाला काही सांगावंस अशी तिची इच्छा आहे.



**भेट झाली—सूर जुळले!**

कारीच्या जणू नकळत त्याला वेल्लुवरने बंदरगावापासून राजधानीकडे ओढीत चालवले होते. बाजारपेठ मागे टाकून ते राहत्या वस्तीत शिरले. विद्यामंदिरे आणि उद्यानाश्रमांच्या जवळपासच वेल्लुवरच्या आईवडिलांचे छोटे सुंदर घर होते. लाकडी घराच्या जाळीदार खिडक्यांना हरणाच्या डोळ्यांसारखी भोके होती. आणि त्याच्या लाकडी दरवाजावरचे कोरीव नक्षीकाम तर फारच सूक्ष्म, गुंतागुंतीचे होते. वेल्लुवरने कारीला म्हटले, "तू बैस इथे जरा बघत. मी आलोच." आणि तो आत दिसेनासा झाला.

एकंदर परिस्थिती त्याच्या आईच्या लक्षात यायला फार वेळ लागला नाही. ती बाहेर आली आणि कारीचा हात धरण्यासाठी तिने हात पुढे केला. पण तो म्हणाला, "थांबा, बाई. मी आधी हातपाय धतो. ती हसली आणि लगेच वेल्लुवर त्याला परसात घेऊन गेला. तिथे एक काळ्या नि लाल रंगाचा भला मोठा चिक्कणमातीचा सुंदर रांजण होता. करीने त्यातल्या पाण्याने हातपाय तोंड धुतले, सारी धूळ नि घाम इतकेच नव्हे तर मनाची थोडी व्यथाही आपण धुऊन टाकीत आहो असे त्याला वाटले.

मग वेल्लुवरच्या आईने दोघांना पुढच्या बागेत नेले. तिथे एक लाकडी बाक होते. त्याचे पाय कासवपाठ आणि मोत्याचे शिंपले यांनी जडवलेले होते. तिथे तिने त्यांच्यासाठी आधीच दोन मोठे पेले ताकाने भरून ठेवले होते. कारी ते प्याला मोठ्या कृतज्ञतेच्या भावनेने जवळच ठेवलेले मऊ पिकलेले केळे त्याने खाल्ले.



पुन्हा हात धुणे झाल्यावर तिघे पायऱ्यांवर बसली आणि वेल्लुवरच्या आईने कारीच्या अंगाभोवती मायेने हात टाकीत म्हटले, "तू असं वाईट वाटून घेऊ नकोस, करी. यवनलोक त्यांच्या पोपटावर प्रेम करतात, त्यांना चांगलं खाऊ पिऊ घालतात. त्या देशातल्या कवींनी भारतातून नेलेल्या पोपटांवर कविता केलेल्या आहे. मला एका यवन व्यापाऱ्यानेच सांगितलं हे."

"पण त्याला वाटेल तितके चांगले पोपट विकत घेता आले असते. माझाच का म्हणून घेतला त्याने?"

"तू तुझ्या पोपटाला इतकं गोड बोलायला शिकवलं होतंस, की त्याला वाटलं हा आपल्या आजारी मुलाची चांगली करमणूक करील" ती म्हणाली.

"माझा पोपट माझ्या भाषेत बोलणार. यवन मुलाला कसं कळणार ते?" कारीने शंका काढली.

"एकदा पोपटाला माणसाची भाषा बोलायचं चांगलें शिक्षण दिलं की तो दुसरी भाषासुद्धा चटकन् शिकतो."

"हं! म्हणजे माझा मोती त्या मुलाशी बोलेल आणि तो मुलगा सुखी होईल. पण मी मात्र नाही होणार!" कारी कडवटपणे म्हणाला.

"बाळ, हे लक्षात ठेव की तो मुलगा आजारी आहे. अंथरुणाला खिळलेला आहे. त्याला रानात फिरता येत नाही, झाडावर चढता येत नाही, किंवा तुझ्यासारखी पाखरंही पाहता येत नाहीत." वेल्लुवरची आई हळुवारपणे बोलत होती.

कारीने यावर बराच विचार केला. मग त्याला एकदम उमाळा आला, "आणि बाबांनी त्याला एका चांदीच्या नाण्यासाठी विकावं! चांदी खातात का?"

"हे बघ, तुझ्या बाबांबद्दलचा हा जो राग तुझ्या मानगुटीवर बसला आहे तो काढून टाक. आता जरा वेळ माझ्याजवळ बैस. वेल्लुवरला मी एक काम सांगितलं आहे. तो आता येईल ते करून. मग तुझा राग घालवून टाकू आम्ही एका गाण्याने."

वेल्लुवरच्या आईने त्याला कारीच्या बाबांना बोलवून आणायला सांगितले होते. कारण वेल्लुवरला खात्रीने असे वाटत होते की आपण वेल्लुवरच्या वडिलांना मघाशी समुद्रकाठी पाहिलं आहे. ते तिथे कारीप्रमाणेच हिरमुले होऊन बसले होते.





बाईंनी घरातून आपली वीणा आणली आणि हलक्या बोटांनी तिच्या तारा छेडीत त्या पोपटाचे गाणे गाऊ लागल्या. हळू-हळू कारीच्या चेहऱ्यावरचा उदासपणा दूर झाला. इच्छा नसताही त्याच्या चेहऱ्यावर हसू उमटले.

तिकडे समुद्रकिनाऱ्यावर वाळूत एक काळा-सावळा, ताकदवान माणूस खिन्न चेहरा करून बसला होता. तो एकदा इकडे पाही, एकदा तिकडे पाही. इतक्यात एरुकच्या माळा घातलेल्या एका मुलाने त्याचा दंड धरून ओढला. "तुम्ही कारीला शोधता आहात, होय ना?" वेल्लुवरने विचारले. "माझ्या घरी आहे तो. आई त्याची समजूत घालते आहे गाणी म्हणून. तुम्ही त्याचा पोपट विकलात ना?"

"माझा इलाज नव्हता!" कारीचे शिकारी बाबा म्हणाले—अशा सुरात की जणू त्यांना कुणीतरी रागे भरलं आहे! "रानटी पोपटाबद्दल चांदीचं नाणं! दुष्काळ पडला तर ते नाणं कामी येईल. पण त्यापायी कारी जर आपल्या आईकडे परत येणार नसेल तर—तर—त्या नाण्याचा काही उपयोग नाही. हे अनोळखी बंदरगाव, गलबतांचं नि मालगड्यांचं शहर, वटवटणारी अनोळखी माणसं, आणि कानांवर सतत आदळणारा पाण्याचा आवाज यामुळे मला कसं चुकल्याचुकल्यासारखं वाटते."

"माझी आई कारीचं मन कळवील आणि तो तुमच्याबरोबर घरी जाईल." वेल्लुवरने त्याला खात्री देत सांगितले. "चला आता लौकर, म्हणजे बांबूवनांतल्या तुमच्या घराकडे जायला निघण्यापूर्वी तुम्हाला दोघांना थोडा फराळ करता येईल."

"पण ते कसं शक्य आहे?" भयभीत झालेला तो गरीब शिकारी म्हणाला. तुझ्या आईसारखी मोठ्या कुळातली बाई माझ्यासारख्या फाटक्या रानटी माणसाला घरात तरी घेईल?"

"ही बाई घेईल!" वेल्लुवर म्हणाला. "चला झटपट, आई तुमची वाट पाहते आहे."

वेल्लुवरने शिकारीदादाला हातपाय धुण्यासाठी एका ओढ्यावर नेले आणि मग पश्चिमेकडे शहराच्या वाटेने त्याला तो घेऊन निघाला. जाताना तो कितीतरी बडबड करीत होता. गोंधळून गेलेल्या त्या डोंगरी माणसाला त्याने वाटेत कितीतरी ठिकाणांची माहिती दिली. शेवटी घराच्या दाराशी त्याने त्याला आणले. वेल्लुवरची आई बाहेर आली ती कारीचा हात धरूनच.

"आम्ही तुमची वाटच पहात होतो" ती आपल्या संगीतासारख्या मंजुळ आवाजात म्हणाली. "परसातल्या बागेत कारीने केळीची पानं मांडली आहेत. मी भात शिजवला आहे. मिऱ्यांचं छान सांबार केलं आहे. ते नि दहीभात खा. अगदी वेळ घालवू नका. जेवून मग लगेच घरी जायला निघा. नाहीतर कारीची आई काळजी करील."

दोघे जेवायला बसले. वेल्लुवरने व त्याच्या आईने त्यांना पोटभर वाढले. वाल्लुवाराची वटवट चालूच होती. पंखासारख्या शेपटाच्या त्या काळ्या भारद्वाज पक्ष्याबद्दल आणि डोंगरातल्या काळविटाबद्दल त्याने कितीतरी प्रश्न विचारले. कारण त्याचे बाबा बिचारे अवाक् होऊन बसले होते.

त्यांच्या घरून निघण्यापूर्वी शिकारीदादा बाईंच्या पाया पडला. बाई म्हणाल्या, "फार अंधार पडायच्या आत तुम्ही घरी पोचलेलं बरं." त्यांच्या स्वरातली चिंता शिकाऱ्याच्या लक्षात आली. आणि उपकाराखाली दडपून गेलेल्या त्या माणसाला आता वाचा फुटली. "बाईसाहेब, तुम्ही आमची काळजी करू नका" तो म्हणाला. माझ्याजवळ एक चकमकीची फिरकी आहे. रानटी जनावरांनी जवळ येऊ नयेत म्हणून मी विस्तव पेटवू शकतो."

बाप आणि मुलगा मुकाट्याने राकडे चालू लागले.

## या मालेची प्रकाशित पुस्तके

| | |
|---|---|
| बापू (चित्रमय जीवन–दोन भागांत विभागून) | एफ० सी० फ्रीटास |
| काश्मीर | छायाचित्रकार : प्रेमानन्द शर्मा<br>लेखिका : माला सिंह |
| पक्षी-जगत | जमाल आरा |
| आमच्या नद्यांची कहाणी | लीला मजुमदार |
| हिमालयाच्या शिखरांवर | ब्रिगेडियर ग्यानसिंह |
| स्वर्गाची सहल व अन्य कहाण्या | लीलावती भागवत |
| सुरस कहाण्या | मनोज दास |
| स्वराज्याची कहाणी—भाग १ | विष्णू प्रभाकर |
| आपल्या आगगाड्यांची कहाणी | जगजीत सिंह |
| त्यांनी पाहिलेला भारत | के० सी० खन्ना |
| चला, नाटक करू | उमा आनंद |
| कोणे एके काळी | एम. चोकसी व पी. एम. जोशी |

प्रत्येकी मूल्य रु० 1·50

ही पुस्तके इंग्रजी व इतर सर्व भारतीय भाषांत प्रसिद्ध होणार आहेत.